**Dr. Narayan R. Varma**
**Asst. Professor**
**Head of Department of History (Seesion 2023-24)**
**Smt. Vatsalabai Naik Mahila MV. Pusad**
**Email ID - narayanvarma67@gmail.com**

| Sr. No. | Tital of Research Paper | Year Publication | Nationa/ International | Page No. |
|---|---|---|---|---|
| 1 | हैद्राबाद स्वातंत्र्य चळवळीत पूसद परिसरातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान एक ऐतिहासिक अध्ययन | March 2024 Journal | UGC Journal Itihas Darpan | 375-380 |
| 2 | भारतीय स्त्री जीवनाच्या प्रगती व उन्नतीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य एक ऐतिहासिक अध्ययन | February 2024 Seminar Presentation | International Peer Revied and Refered Indix | 16-20 |
| 3 | स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री सुधारणा चळवळीचे स्वरुप | 04 Oct. 2023 Conference Paper | International Peer Revied and Refered Indix | 27-30 |
| 4 | पर्यावरण शिक्षणाचा अभ्यास काळाची गरज एक चिकित्सक अध्ययन | Journal Scholar Vision | International Peer Revied and Refered Journal Volume XII | 30-33 |
| 5 | म. गांधीजी व ग्रामराज्याची संकल्पना एक अध्ययन | Feb. 2024 Book Chapter | National | 1-6 |
| 6 | स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री सुधारणा चळवळी चे स्वरुप आणि ऐतिहासिक मूल्यांकन | April 2024 Book Chapter | Natinal | 17-21 |

विशेष अंक
मार्च 2024

ISSN : 0974-3065

# इतिहास दर्पण
# ITIHAS DARPAN

कलियुगाब्द ५१२५, विक्रम संवत् २०८०
इसवी सन् २०२३

Indian Council of Historical Research Sponsored Two Day National Conference on
Contribution of Marathwada in the Hyderabad Freedom Struggle
Organized by Indraraj College, Sillod 1 & 2 March 2024

अखिल भारतीय इतिहास संकलन योजना की शोध पत्रिका
आपटे भवन, केशव कुंज, झंडेवाला, नई दिल्ली - ११००५५
RESEARCH JOURNAL OF AKHIL BHARTIYA ITIHAS SANKALAN YOJANA
Apte Bhawan, Keshav Kunj, Jhandewala, New Delhi - 110055

## UGC Journal Details

| | |
|---|---|
| Name of the Journal | : Itihas Darpan |
| ISSN Number | : 09743065 |
| e-ISSN Number | : |
| Source | : UNIV |
| Subject | : Archaeology; Architecture; Cultural Studies; Philosophy; Religious studies; Social Sciences (all), Visual Arts and Performing Arts |
| Publisher | : Akhila Bharatiya Itihasa Samkalana Yojana |
| Country of Publication | : India |
| Broad Subject Category | : Arts & Humanities; Social Science |

॥ नामूलं लिख्यते किञ्चित् ॥

ISSN : 0974-3065

# इतिहास दर्पण

# ITIHAS DARPAN

विशेष अंक मार्च २०२४

कलियुगाब्द 5125, विक्रम संवत् 2080, ईसवी सन् 2024
Kaliyugābda 5125, Vikrama Saṁvat 2080, i.e. CE 2024

Chief Editor
Susmita Pande

प्रधान संपादक
सुस्मिता पाण्डे

Editors
Ratnesh Kumar Tripathi
Narendra Shukla

संपादक
रत्नेश कुमार त्रिपाठी
नरेन्द्र शुक्ल

॥ नामूलं लिख्यते किञ्चित् ॥

अखिल भारतीय इतिहास संकलन योजना
बाबा साहेब आपटे स्मृति-भवन, 'केशव-कुञ्ज', झण्डेवाला, नयी दिल्ली-110 055

AKHILA BHĀRATĪYA ITIHĀSA SAṄKALANA YOJANĀ
Baba Saheb Apte Smriti Bhawan, 'Keshav Kunj', Jhandewalan, New Delhi-110 055

| | | | |
|---|---|---|---|
| ५९ | उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यांतील निजामी राजवटीबद्दल जनतेतील असंतोष एक अभ्यास | अनिल तानाजी जाधवर | ३२१-३२९ |
| ६० | मराठवाडा मुक्तिसंग्रामातील साहित्य लेखन | डॉ. रामेश्वर ज. चाटे | ३३०-३३४ |
| ६१ | स्वामी रामानंद तीर्थ यांचे शैक्षणिक कार्य | कल्पना अंबादास गिरे | ३३५-३३९ |
| ६२ | हैदराबाद मुक्तीसंग्रामातील उपेक्षित हुतात्मा : पत्रकार शोएब उल्ला खान | शेख इरफान शेख अय्युब<br>डॉ. टी. आर. पाटील | ३४०-३४६ |
| ६३ | हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील स्त्रियांचा सहभाग त्यांचे कार्य आणि योगदान | तेजस्विनी रामदास तारु | ३४७-३५९ |
| ६४ | स्वा.सै. उत्तमराव मखाजी देसले यांचा हैदराबाद मुक्ती संग्रामात सहभाग | डॉ. जे. डी. गोपाळ | ३६०-३६७ |
| ६५ | झुंजार सेनानी स्वामी रामानंद तीर्थ | सीमा भाऊसाहेब शेलार<br>डॉ. किशोरकुमार गव्हाणे | ३६८-३७४ |
| ६६ | हैद्राबाद स्वातंत्र चळवळीत पुसद परिसरातील स्वातंत्र सैनिकांचे योगदान एक ऐतिहासिक अध्ययन | डॉ. एन.आर. वर्मा | ३७५-३८० |
| ६७ | मराठवाडा प्रदेशाची सांस्कृतिक जडणघडण | डॉ. सतीश खरात | ३८१-३८७ |
| ६८ | हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील आर्य समाजाची भूमिका | डॉ. केशव अंबादास लहाने | ३८८-३९० |
| ६९ | हैद्राबाद मुक्ती संग्रामातील महिला समाज सुधारकांचे योगदान | श्री. सिताराम आवडजी अनाप | ३९१-३९५ |
| ७० | स्वामी रामानंद तिर्थ आणि वंदे मातरम चळवळ | डॉ. जाधवर बी.डी | ३९६-४०१ |
| ७१ | हैदराबाद मुक्तिसंग्रामात मराठवाड्याचे योगदान | डॉ. गंगणे अमोल उत्तमराव | ४०२-४०७ |
| ७२ | हैदराबाद संस्थानातील विविध प्रादेशिक संघटना व त्यांचे कार्य | डॉ. धीरजकुमार नजान | ४०८-४१३ |
| ७३ | हैदराबाद मुक्ती संग्रामात मराठवाड्यातील व्रतपत्रांचे कार्य: एक अभ्यास विशेष संदर्भ मराठवाडा वृतपत्र | डॉ. विठ्ठल बाबुराव गुंडे | ४१४-४१८ |
| ७४ | मराठवाड्यातील आर्य समाजाचे कार्य; समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. कालिदास मारुती भांगे | ४१९-४२७ |
| ७५ | हैद्राबाद मुक्ती चळवळीत मराठवाड्यातील दगडाबाई शेळके यांचे योगदान | शितल उत्तमराव सावंत | ४२८-४३२ |
| ७६ | हैद्राबाद मुक्तिसंग्राम भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अंतिम पर्व | डॉ. नरवाडे जे. एम. | ४३३-४३८ |
| ७७ | हैदराबाद मुक्तिसंग्रामात महिलांचा सहभाग | प्रा. विशाल रामदास रोकडे | ४३९-४४४ |
| ७८ | मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृतमहोत्सव : महाराष्ट्र शासनाची भूमिका | बळीराम शेषेराव चव्हाण<br>डॉ. सुहास रंगनाथ मोराळे | ४४५-४५६ |
| ७९ | आर्य समाज असांप्रदायिक सत्याग्रह | डॉ. नम्रता दिलीप भोसले<br>एल. डी. मंडावत | ४५७-४६० |

ISSN : 0974-3065 | इतिहास दर्पण ITIHAS DARPAN | 1 & 2 March 2024 Special Issue

# हैद्राबाद स्वातंत्र चळवळीत पुसद परिसरातील स्वातंत्र सैनिकांचे योगदान एक ऐतिहासिक अध्ययन

प्रा. डॉ. एन.आर. वर्मा
इतिहास विभाग प्रमुख
श्रीमती. वत्सलाबाई नाईक महिला
महाविदयालय, पुसद
जि. यवतमाळ (महाराष्ट्र)
narayanvarma67@gmail.com
Mob. 9420773203

**प्रस्तावना –**

भारताच्या स्वातंत्र्यानंतर (1947) हैद्राबाद संस्थान ला भारतात विलीन करण्यासाठी जो संघर्ष करावा लागला त्याला हैद्राबाद स्वातंत्र संग्राम असे ओळखल्या जाते. कारण भारत स्वातंत्र झाल्यावर भारतातील 563 संस्थाने भारतीय संघराज्यात विलीन झाली. फक्त हैद्राबाद आणि काश्मिर हे संस्थान स्वच्छेने भारतात सामील होण्यास नकार देत होते. तेंव्हा हैद्राबाद संस्थान हिंदूस्थान मधील सर्वात मोठे व सर्वात श्रीमंत संस्थान म्हणून ओळखले जात असे. या संस्थानमध्ये असफजाही घराण्याची सत्ता असून नबाब मीर उस्मान अली कडे राज्याचा सर्व कारभार होता. त्याचा ओढा पाकिस्थानकडे जास्त असल्याने त्याने तत्कालीन हिंदूस्थान मध्ये समाविष्ठ करण्यास चालढकल करीत असे. त्याला तत्कालीन बॅ. जिना आणि इंग्लंड राजवटीमधील काही हितसंबंधीचे समर्थन असावे. हैद्राबाद संस्थान मध्ये तेंव्हा 80% जनता हिंदू असून भारतीय संघ राज्यात समाविष्ठ होण्यासाठी तयार होती. परंतू मीर उस्मान अली भारत सरकारला विरोध करीत असे. आपल्या संस्थान मध्ये मीर उस्मान अलीने मुस्लीम जनतेला फार प्राधान्य देऊन राज्यकारभार, प्रशासनात मूस्लीम सेवक जास्त प्रमाणात ठेवले होते. इ.स. 1724 ते 1948 पर्यंत निझाम ने हैद्राबाद संस्थानमध्ये राज्य केले. तेंव्हा मीर उस्मान अली व त्याचे रझाकार सैनिक हिंदू जनतेवर अन्यायी धोरणाचा अवलंब करुन लोकांवर अनेक प्रकारचे अत्याचार, छळ करुन वाईट वागणूक देत असत. म्हणून हैद्राबाद संस्थान मधील जनता, पुसद परिसरातील जनता स्वातंत्र सैनिक, सशस्त्र कॅम्प करणारे दल यांनी हिंदू जनतेच्या अत्याचारा ची, कौर्याची बाजू समजून घेतल्यानंतर हिंदू महासभा, आर्य समाज च्या माध्यमातून हैद्राबाद संस्थानमध्ये निझाम च्या विरोधात स्वातंत्र चळवळी सुरु केल्यात. शेवटी पुसद परिसरातील स्वातंत्र सैनिकाचे कार्य,

योगदान अभ्यासन्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

कीवर्ड – हैद्राबाद संस्थान, मीर उस्मान अली, सशस्त्र कॅम्प, स्वातंत्र सैनिक, पुसद

**संशोधनाची उदिष्ठये –**

1) हैद्राबाद संस्थान त्याचा भुभाग, क्षेत्रफळ, लोकसंख्या, भाषा, निझामी घराणे चा अभ्यास करणे.

2) हैद्राबाद संस्थान मधील निझामी राजवट, रझाकार सैनिकाचे कृत्य चा अभ्यास करणे.

3) हैद्राबाद संस्थान मधील हिंदू जनतेवरील अन्याय, अत्याचार, क्रूरता चा अभ्यास करणे.

4) पुसद परिसरातील आर्य समाज, हिंदू महासभा, सत्याग्रही चा अभ्यास करणे.

5) पुसद परिसरातील स्वातंत्र सैनिकाचे कार्य, सशस्त्र क्रांतीकारकांचे कॅम्प, यांचे कार्य चा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दत –**

विषयाला अनूसरुन ऐतिहासिक संदर्भ ग्रंथ पध्दत नुसार संशोध करुन दुय्यम प्रकाशित साधने, लेख, मूलाखती व्दारे संशोधनाचा अभ्यासपूर्ण निष्कर्ष काढून मांडणी करुन संशोधन लेख पूर्ण केल्या जाईल.

**संशोधनाची रचना –**

**हैद्राबाद संस्थान चा भुगोल व इतिहास –**

भारतात ब्रिटिश काळात 565 संख्यानीक ची राज्ये होती. त्यापैकी हैद्राबाद संस्थान प्रचंड श्रीमंत व क्षेत्रफळाने, भुगोलाने मोठे राज्य होते. असफजाही घराण्याचा वारसदार नबाब मीर उस्मान अली हैद्राबाद संस्थानचा कारभार पाहत असे. तो पाकिस्थानी समर्थक असल्यामूळे भारताचा संबंध हैद्राबाद संस्थानशी येऊ नये ही त्याची विचारधारा होती. हैद्राबाद संस्थानला तो आपली खाजगी मालमत्ता समजून राज्यकारभार करतांना मुस्लीम जनतेला प्रशासनात महत्वाची भुमिका देत असे. वास्तवीक पाहता हैद्राबाद संस्थान मध्ये 80% जनता हिंद्रू होती. या संस्थान मध्ये तेलगू, मराठी, हिंदी, उर्दू, कानडी भाषा बोलणारे, शिकणारी जनता राहत असे. या संस्थान मध्ये आजचा मराठवाडा, तेलंगना, हैद्राबाद, कर्नाटक राज्ये होती आणि क्षेत्रफळ 82698 चौरस मैल म्हणजे 2 लाख 11 हजार 706.88 चौरस किलोमिटर्स होते. या संस्थान मध्ये चार सुभे असून त्यामध्ये औरंगावाद, वीड, परभणी, लातूर, नांदेड, उस्मानाबाद, बिदर, रायचूर, गुलबर्गा, वरंगल, करिमनगर, अदिलाबाद, मेदक, निझामाबाद, नळगुंडा, मेहबूनगर असे जिल्हे असायचे आणि वार्षिक उत्पन्न इ.स. 1936 च्या अंदाजपत्रक प्रमाणे 08 कोटी 56 लाख 50 हजार इतके होते. या संस्थानची लोकसंख्या 01 कोटी 63 लाख 38 हजार 534 इतकी असून 80% हिंदू जनतेच्या वाटयाला दु:ख, दारिद्रय, अन्याय, अत्याचार, क्रूरपणा येत असे. महिला वर्गावर वारंवार अन्याय, अत्याचार होत असल्याचे चित्र होते. मुस्लीमवर्गाचे महत्व वारंवार दिसून पडत असे. या संस्थान मध्ये भारतीय चलन बेकायदेशरी ठरवून शिक्षणात उर्दू भाषेला महत्व होते. रझाकार ला सरकारी पाठिंबा असल्याने त्याना पगारा सोबत इतर अधिकार होते. त्यांनी हिंदू

जनतेच्या शेती, संपत्ती, उदयोगधंदे चा ऱ्हास केला. एकंदरीत इस्लामी राजवटी नुसार कारभार चालत असल्याने हिंदू जनतेला फार त्रास सहन करवा लागत असे. या संस्थान मध्ये हैद्राबाद स्टेट काँग्रेस, हिंदू महासभा, आर्य समाज, सत्याग्रही, क्रांतीकारी विचाराचे, सरकारी धर्तिणे कंम्पु याचे वारंवार संघर्ष चळवळी चालत असल्याने धरपकड, तुरुंगात टाकणे, जोर जबरदस्ती, मारपीट, अत्याचार, दप्तरजाळणे, चौक्या नेस्तनाभूत करणे, असे प्रकार नेहमीच घडत असत. या स्वातंत्र्य चळवळीत पुरुषाप्रमाणे स्त्रीवर्गाने सुध्दा महत्वाची भुमिका पार पाडलेली दिसून येते. स्वातंत्र सैनिकासाठी स्त्रीवर्गाने अन्न, पाणी, कपडे, औषधी, पुरवीण्याचे कार्य करुन रझाकार सैनिकच्या कटकारस्थान मधून स्वातंत्र्य सैनिकांना वाचवीणे, प्रोत्साहन देण्यासारखे कार्य केले.

एकंदरीत हैद्राबाद स्वातंत्र चळवळ म्हणजे धार्मिक संस्कृती सामाजीक सांस्कृतीक, आर्थिक संस्कृती आणि स्वातंत्र्यासाठी केलेला संग्राम होय. रझाकार सैनिकाच्या विरोधात, धर्मान्ध्ानिझामी राजवट विरुध्द भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, हिंदू महासभा, आर्यसमाज आणि हिंदू जनता, सशस्त्र क्रांतीकारकांचे लढे चा संघर्ष होय.

**आर्य समाजाचे कार्य –**

पुसद परिसराती, पुसद शेंबाळपिंप्री, उमरखेड या भागातील आर्य समाज, सशस्त्र क्रांतीकारकांनी कॅम्प च्या माध्यमातून निझाम समर्थक रझाकार सैन्या विरुध्द हिंसक कारवाया केल्या. कारण निझामने प्रशासन, निमलष्करीदले, रझाकार मार्फत हिंदू जनतेवर क्रूरपणे अत्याचार करण्याचे सत्र सुरु केले होते. इ.स. 1938-39 मध्ये पुसद मधिल आर्य समाजाचे श्री. शंकरलाल किसनलाल अग्रवाल आर्य समाजाचे कामकाज पहात. पंजाब मधून आर्य समाजाचे लोक हैद्राबाद संस्थानमध्ये चळवळीसाठी येत असतांना पुसद, शेंबाळपिंप्री कॅम्प मध्ये राहत असत. त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा आणि इतर साहित्याची मदत श्री. शंकरलाल अग्रवाल करत. पुसद ला थांबुन भागानगर चा सत्याग्रहाची योजना आखण्याचे कार्य होत असे. या आर्य समाजाचे लोक हैद्राबाद संस्थान मध्ये पकडल्या जात तेंव्हा त्या सत्याग्रहींना तुरुंगात टाकून त्याच्यावर मनसीक, शारिरिक आघात करण्यासाठी ब्रेडमध्ये काचाचे तूकडे टाकणे, पीठात हाडाची पूड, सिमेन्ट टाकणे, कच्चे अन्न खाण्यास देणे, तुरुंगात अस्वच्छता वाढवीणे, मारहान करणे असे प्रकार घडत.

**हिंदू महा सभेचे कार्य –**

हैद्राबाद स्वतंत्र चळवळीत हिंदू महासभा ने स्वयंस्फुर्तीने भाग घेऊन भारतीय राजकारणावर महत्वपूर्ण प्रभाव टाकला. पुसद मधील श्री. पुरुषोत्तम पोळकर हिंदू महासभाचे प्रमूख कार्यकर्ता होते. त्यांनी हिंदू जनतेवरील होणारे निझामी हल्ले रोखण्यासाठी सशस्त्र कॅम्प करुन राहणाऱ्यांना मदत केली. त्यांच्या सोबत श्रीरामभाऊ भोपी, श्री. कदम, श्री. यशवंतराव सरनाईक, श्री. जकाते वकील होते. या सर्वांनी हैद्राबाद स्वातंत्र चळवळीत प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष भाग घेतला. तर रझाकार सैनिक हैद्राबाद संस्थान चे रक्षण

करण्यासाठी लष्करीदल होते. ते हिंदू लोकांच्या घरात घूसून संपत्तीची नासाडी करणे, संपत्तीची लूट करणे, हिंदू जनतेचे खून करणे, महिलांवर अत्याचार करणे असे प्रकार करुन ही चळवळ दडपण्याचा प्रयत्न करीत. रझाकार सैनिक ज्या गावात जात तेथे लोकांना मोकळेपणाने हिंडणे, फिरणे अवघड करीत. सर्व बंधने हिंदू जनतेसाठीच होती. हिंदू धर्माचे, हिंदू लोकांचे मानसीक खच्चीकरण व्हावे हा या मागील उददेश होता. हैद्राबाद संस्थान चे राज्यकर्ते मुस्लीम असल्याने तेथील बहुसंख्य हिंदू जनतेने आपल्या अंकीत रहावे या विचारा नुसार मीर उस्मान अली कार्य करीत असे.

म्हणूनच पुसद जवळील शेंबाळपिंप्री येथे सशस्त्र कॅम्प करुन क्रांतीकारक राहत असत. काही क्रांतीकारक भुमीगत राहून हिंदू जनता, स्त्रीवर्गाला मदत करीत असत. अनेक वेळा भुमीगत क्रांतीकारक आणि रझाकार चे संघर्ष घडून आले.

**गोधाजीराव मुखरे व उमरी बँक लूट प्रकरण –**

कै. गोधाजीराव मुखरे चा जन्म पुसद मध्ये एका श्रीमंत, जमीनदार घराण्यात 01 जानेवारी 1915 रोजी झाला. त्याचे वडील कै. सखारामअप्पा मुखरे पुसद चे श्रीमंत जमिनदार होते. त्यांच्याकडे हजारो एकर जमीन होती. कै. गोधाजीराव मुखरे इ.स. 1939 मध्ये पुसद नगर पालिकाचे अध्यक्ष बनले. परंतू म. गांधीजीच्या सत्याग्रहासाठी त्यांनी 'व्यक्तिगत सत्याग्रहसाठी' पुसद नगर पालिका अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. कै. गोधाजीराव मुखरेचे नाव हैद्राबाद स्वातंत्र चळवळीत "उमरी बँक लूट प्रकरण" मध्ये येते. त्यांनी उमरी बँक लूट करण्यासाठी सहा तूकडया निर्माण करुन प्रत्येक तूकडीकडे एक एक जबाबदारी दिली. त्यांचा उमरी बँक प्रकरणामध्ये सहभाग का होता हे विचार करणारे तत्व आहे. कारण हैद्राबाद संस्थान मधील निझामी राजवट चे अन्याय, अत्याचार हिंदू जनतेवर फार वाढले होते. निझामचे रझाकार सैनिक हिंदू जनता, हिंदू महिला वर्गाची अन्यायी, अत्याचारी घटना वाढवीण्याचे कार्य करीत. म्हणून मीर उस्मान अली चे नाक कापावे, हिंदू जनता, महिला चा बदला घ्यावा या उददेशाने त्यांनी उमरी बँक लूट ची योजना आखली. उमरी हे गांव वऱ्हाड (विदर्भ) मधिल उमरखेड कॅम्प पासून 60 मैल दूर होते. या उमरी बँकेत 60-70 लाख रुपये असायचे. उमरी बँक लूट चे नेतृत्व श्री. अनंत भालेराव कडे होते. पण निझाम सरकारला सुगावा लागल्याने उमरी बँक ची सुरक्षितता वाढवीण्यात आली होती. त्या शिवाय निझामने अरबी लोकांचे खाजगी पथक तयार करुन स्व:ताहाची सूरक्षितता वाढवीली होती. या अरबी लोकांना निझाम संस्थान मध्ये 'चाऊस' म्हटले जात असे. निझाम सरकारने उमरी गावाची चारही बाजूने सुरक्षित कोंडी केली असल्याने उमरी गावाचे वातावरण संघर्षमय, तंग असायचे. या स्थितीत कित्येक व्यापाऱ्यांनी उमरी बँकेतून आपल्या रक्कमा काढल्या. शेवटी बँक लूट होणार ही अफवा आहे हे पसरवीण्यात आले. काहीकाळ ही बँक लूट ची योजना स्थगित करण्यातआली. नंतर निझाम

च्या लक्षात आले की ही अफवा आहे म्हणून बँकेच्या पहाऱ्यात ढिलाई होऊ लागली. बरेच सशसत्र दल बँकेतून काढून घेण्यात आले. तेंव्हा 30 जानेवारी 1948 रोजी म. गांधीजीच्या हत्याकांड मूळे वातावरण शोकमग्न झाले होते. अशा परिस्थीतीचा फायदा घेऊन कै. गोधाजीराव मुखरे व इतर साथीदार यांनी उमरी बँकेवर लूट घडून आनली. क्रांतीकारकांनी बँकेतील लूटीची रक्कम बारदान्यात भरुन पुसद ला आनण्यात आली. एका मॅजिस्टेट समोर ती रक्कम मोजली असता 20 लाख 65 हजार भरली. या उमरी बँक लूट प्रकरणात 11 व्यक्ती ठार झाले. हे सर्व निझाम राजवटीचे पोलीस, कॅशिअर, अरब, रझाकार सैनिक होते.

अशा रितीने कै. गोधाजीराव मुखरे व त्यांच्या सहकारी यांनी बँक लूटून निझामाला नामोहरण केले. या लूट रक्कमेचा उपयोग हैद्राबाद संस्थान मधील रझाकार विरुध्द शस्त्रे खरेदी करणे, वृत्तपत्रेसाठी जागा घेणे, भवन बांधणे, वाचनालय स्थापन करणेसाठी खर्च करण्यात आला. निझाम ला धडा शिकवीणे, जशास तसे उत्तर देणे हा या मागचा उददेश होता.

**सारांश –**

हैद्राबाद संस्थान धर्मान्ध, निझामी, संप्रदायीक, जूलमी, भारतीय संघराज्य विरुध्द, राष्ट्रीय भावने विरुध्द, एक अत्याचारी शासक चे प्रतिक होते. हैद्राबाद संस्थानला राष्ट्रीय भावना नसून एक खाजगी मालमत्ता निर्माण करण्याचे उदिष्ठ होते. निझाम व त्यांचे पाठीराखे हैद्राबाद संस्थानला स्वतंत्र ठेवण्याचे स्वप्न पाहत. हैद्राबाद संस्थान मध्ये हिंदू जनतेवर लूटपाट, जाळपोळ, हत्या, खंडणीवसूली, महिलावर अत्याचार, धर्मान्धता मोठया प्रमाणात होत असे. निझामाने हिंदू जनतेच्या सण, उत्सवावर बंदी घालून, मंदिरे तोडणे, मिरवणूक न करु देणे. हिंदू चे मानसीक खच्चीकरण करणे सारखे प्रकार केले. सर्व प्रकारची बंधने हिंदू जनतेला होती. भारतात राहून एक इस्लामीक राज्य निर्माण करायचे होते. म्हणून त्याने हैद्राबाद संस्थानला भारतात विलीन करण्यास नकार दिला. शेवटी आर्य समाज, हिंदू महा सभा, सत्याग्रही सशस्त्र क्रांतीकारक कॅम्प चे सैनिक यांनी निझाम च्या विरुध्द सत्याग्रह, सशस्त्र लढा दिला. शेवटी निझामचे प्रशासन, रझाकार सैन्य विरुध्द स्वातंत्र चळवळी घडून आल्या. निझाम विरुध्द, त्यांच्या कारभार विरुध्द जनता एकत्र आली. संस्थान मधील सर्व जिल्हयात जागृती, संघर्ष झाले. भारत सरकारने तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या आदेशाने अन्यायाच्या कळसातून दि. 13 सप्टेंबर ते 17 सप्टेंबर 1948 असे 04 दिवस पोलीस ॲक्शन झाली. शेवटी हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात समाविष्ठ झाले. यासाठी या भागातील परिसरातील स्त्री-पुरुष जनतेने चळवळी करुन, आपल्या प्राणाची आहूती दिली, अनेकांनी बलिदान दिले आणि तुरुंगवास भोगून अत्याचार सहन केला.

अशा प्रकारे भारतीय स्वातंत्र्य लढया सोबत हैद्राबाद स्वातंत्र होण्यासाठी लढा देण्यात आला. हैद्राबाद संस्थान मध्ये भारतीय तिरंगा फडकवीण्यासाठी ज्याज्या घटकांनी,

सैनिकांनी सहभाग घेतला त्याचे योगदान विसरता येत नाही. यामूळे भारताची सांघीक शक्तीवाढली व एकतेला बळकटी आनली. पुसद परिसरातील स्वातंत्र सैनिकाचे योगदान, त्यांची कामगिरी पुढील पिढीला प्रेरणादयी राहिल यात शंका नाही.

**संदर्भ ग्रंथ व टिपा –**


1) डोळे ना.य. 1998 – हैद्राबादचा स्वातंत्र संग्राम, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई

2) संपादक 2023 – लढा मराठवाडा मुक्ती संग्रामचा, सांस्कृतीक वार्तापत्र प्रकाशन, पुणे

3) डॉ. कठारे अनील 2011 – समग्र संशोधन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

4) डोईफोडे सुधाकर 1999 – प्रवर्तनाचे दिवस, निर्मल प्रकाशन, नांदेड

5) डॉ. देशमुख किरण 2001 – मुक्तीवेध, निर्मल प्रकाशन, नांदेड

6) खापरे दादा 2008 – विदर्भाचे स्वातंत्र योध्दे बाबासाहेब मूखरे, संजीवनी प्रकाशन, इचलकरंजी.

7) संपादक 2001 - युगधारा, नवसहस्त्र स्वागत वर्ष समिती, पुसद

8) मुलाखती -

1) श्री. पुरुषोततम वासूदेव पोळकट, स्वातंत्र सैनिक, पुसद

2) श्री. रामभाऊ प्रल्हाद भोपी, स्वातंत्र सैनिक, पुसद

3) श्री. नारायण कोंडबा व्यवहारे, स्वातंत्र सैनिक, पुसद

4) श्री. दत्तात्रय पंढरीनाथ व्यवहारे, स्वातंत्र सैनिक, पुसद

5) श्री. गिरधारीलाल अग्रवाल, हिंदी वाचनालय, पुसद

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## February - 2024

(CDLVII) 459

# Perspectives of Ambedkarism



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Dr. Santosh Bansod
Co-ordinator
Dr. Ambedkar Studies Centre,
SantGadge Baba Amravati
University, Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLVII) 459 -B
ISSN : 2278-9308
February 2024

## INDEX


| No. | Title of the Paper — Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | भारतीय लोकशाही विषयी डॉ. आंबेडकरांचे विचार. डॉ. टी. जी. हापसे | 1 |
| 2 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील समतावादी समाज — डॉ. भगवान गरूडे | 3 |
| 3 | भारतीय संविधान आणि डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुखांचीभूमिका — कु.अंजली किशोर नांदेकर | 6 |
| 4 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवतावादी कार्याचे अध्ययन. — प्रा.डॉ. सुरेश पंडित | 9 |
| 5 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवमुक्ती लढ्यासाठी आयोजित परिषदांचे समकालीन मराठी वर्तमानपत्रातून दिसणारे प्रतिबिंब — आकाश प्रशांत मेश्राम प्रा. डॉ. सुरेश पंडित | 12 |
| 6 | भारतीय स्त्री जीवनाच्या प्रगती व उन्नतीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य एक ऐतिहासिक अध्ययन — प्रा.डॉ. एन.आर. वर्मा | 16 |
| 7 | चाकमा जनजाति और सामाजिक जीवन — नेहा चंद्रभान गजभीये , डॉ. नीरज बोधि | 21 |
| 8 | अस्पृश्य महिलांच्या झालेल्या सांस्कृतिक बदलामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार कार्याचे ऐतिहासिक विश्लेषण — शोनिल दादाराव सुखदेवे,प्रा. डॉ. कैलास जे. गायकवाड | 30 |
| 9 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिलांविषयी कार्य — डॉ. अमोल रमेशराव बोरकर | 36 |
| 10 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शैक्षणिक दृष्टिकोन — गोपाल मधुकर राठोड | 39 |
| 11 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर: भारतीय कामगारांचा महान हितकारक नेता — नारायण थोरात | 43 |
| 12 | कामगार कल्याण आणि बाबासाहेब आंबेडकर — प्रा. प्रदीप भालचंद्र मेश्राम | 49 |
| 13 | कादंबरीकार अवधूत डोंगरे यांचे साहित्यविचार — श्रीकांत माणिकराव तायडे | 52 |
| 14 | धुळे जिल्ह्यातील महिलांचे राजकीय, सामाजिकआणि शैक्षणिक योगदान — प्रा. शीतल वुधा सोनवणे , प्रा. डॉ. संतोष पां. बनसोड | 58 |
| 15 | सर्वहारा समूहाची सर्वांगिण उन्नती साधण्यासाठीची समानसंधी म्हणजे सांविधानिक रिझर्वेशन अर्थात सांविधानिक संरक्षण — ॲड. राजेश तायडे | 63 |
| 16 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक थोर अर्थतज्ञ — कु. वंदना धवणे , प्रो. डॉ. कविता. तातेड | 68 |




B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLVII) 459 -B
ISSN : 2278-9308
February 2024


| No. | Title of the Paper — Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 17 | डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील काळाराम मंदीर प्रवेश सत्याग्रहा चे अध्ययन — वाल्मीक पुंजारामजी डवले | 72 |
| 18 | मराठवाड्यातील कामगार चळवळीचा उदय — कु. माधुरी शंकर खामनकर | 77 |
| 19 | आंबेडकरवाद आणि मानवी हक्क यातील सहसंबंधाचे विश्लेषणात्मक अध्ययन — श्री. पंडित चंपतराव भोयर | 79 |
| 20 | आंबेडकरवादचे सामाजिक-धार्मिक आणि शैक्षणिक दृष्टीकोन — प्रा.डॉ.नामदेव ढाले , उमेश राऊत | 84 |
| 21 | कस्तुरबा गांधी यांचे दक्षिण आफ्रिकेतील कार्य — कु. रोहिणी रमेशराव डिक्कर | 87 |
| 22 | भारतीय संविधान उद्देशिका, मूलभूत हक्क,राज्याची मार्गदर्शक तत्वे — सौ. शारदा च. कोलटेके | 90 |
| 23 | श्री चक्रधरांची सामाजिक क्रांती — प्रा.डॉ.कल्पना त्र्यं. मेहरे | 96 |
| 24 | आंबेडकरवादाचा मानवतावादी दृष्टिकोन — प्रा.डॉ. विनोद नामदेव इंगळे | 99 |
| 25 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार विषयक कार्य — प्रा.डॉ. श्रीहरी एम. सानप | 102 |
| 26 | स्वतंत्र मजूर पक्षाचे मुंबई विधानसभेतील कार्य : ऐतिहासिक अध्ययन — श्री. प्रकाश रामदास बनसोड | 105 |
| 27 | आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टिकोनावर एक अभ्यास. — वाय. जी. भैसारे | 108 |
| 28 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय महिला सशक्तीकरणातील योगदान — एस. डी. इंगळे | 111 |
| 29 | राष्ट्रीय एकतेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भरीव योगदान — दिलीप महादेवराव धवने | 114 |
| 30 | सविनय कायदेभंगाच्या चळवळीत पूर्व विदर्भातील महिलांचे योगदान — श्री. निखिल सुधाकर सोळंके | 117 |
| 31 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास — प्रा. सुरेश ज्ञानबा पवार ,डॉ. के.बी. नायक | 124 |
| 32 | आंबेडकर चळवळीचे ऐतिहासिक अध्ययन – अमरावती जिल्हा — प्रेम स. मंडपे | 128 |
| 33 | आंबेडकरांच्या धम्म दिक्षेनंतर शिक्षित महिलांमध्ये झालेले सामाजिक परिवर्तन — सौ. उज्ज्वला आत्माराम खंडारे (इंगोले) | 133 |
| 34 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे अस्पृश्यता निवारण्यातील योगदानाचे ऐतिहासीक अध्ययन — दिपराव गोविंदराव माहोरे | 139 |
| 35 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : आमूलाग्र समाज परिवर्तनाचे महामेरू . — रोशन रामदास भटकर | 142 |

# भारतीय स्त्री जीवनाच्या प्रगती व उन्नतीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य एक ऐतिहासिक अध्ययन

प्रा.डॉ. एन.आर. वर्मा
इतिहास विभाग प्रमुख श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय,पुसद ता. पुसद जि. यवतमाळ
Email ID : narayanvarma67@gmail.com , Mob.No. : ९४२०७७३२०३

सारांश —

डॉ. बाबासाहेब आंबेडकर २० व्या शतकातील महान समाज सुधारक व स्त्रीवर्गाचे उध्दारक होते. त्यांनी हिंदूधर्म व समाज मधील अनेक वाईट कुप्रथा, अंधश्रध्दा, परंपरा दूर करून स्त्रीवर्गाची उन्नती व प्रगती साधण्याचा प्रयत्न केला. त्यांनी भारतीय समाजातील व सर्व वर्गातील स्त्रियांसाठी समानता निर्माण करण्याचे प्रयत्न केले. भारतीय स्त्रीवर्गासंबंधी जीवनपध्दत पाहून त्याचे मन दुःखी होत असे. स्त्रीवर्गाच्या न्यायासाठी त्यांनी मनूस्मृती ग्रंथाची होळी केली. स्त्री वर्गावर होणारा अन्याय, अत्याचार दुरकरण्यासाठी त्यांनी हिंदूकोड बील लोकसभेत मांडून स्त्रीवर्ग बद्दल आपले कार्य कर्तुत्व दाखवीले. स्त्रीवर्गानी शिक्षण घ्यावे हे त्यांचे प्रखर गत होते. स्वातंत्र्य, समता, समानता, बंधूता, न्याय हे तत्व त्यांचे आदर्श होते. त्यांनी सामाजिक सुधारणेसाठी अनेक चळवळी केल्या. ते देशभक्त होते ते सामाजीक लोकशाहीचे पूरस्कर्ते होते. त्यांना एक आदर्श समाज निर्माण करायचा होता. त्यांनी भारतीय समाजातील स्त्रीवर्गाची स्थिती, दर्जा सुधारणे संबंधी कार्य केले. स्त्री—पुरूष समानता हेच त्यांचे प्रखर तत्व होते. त्यांना भारतीय समाजात उदारता निर्माण करायची होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटना लिहून त्या राज्यघटनेत कलम १४, १५, १६, १७, १८, ३९, ४२, ३२५ अन्वये तरतूदी करून कायदयापूढे मानवतावाद, समानता, समान वेतन, लिंगभेद आळा, स्त्रीवर्गासाठी सुधारणा कायदे ची तरतूद केली. म्हणूनच त्यांना सामाजिक समरसताचे जनक मानले जाते. स्त्रीवर्गाने शिक्षण घेउन आपली प्रगती, उन्नतीचे ध्येय पूर्ण करावे असे त्यांना वाटत असे. स्त्री सक्षमीकरण आणि स्त्री सबलीकरणसाठी त्यांनी अनेकांचा विरोध पत्करून कार्य केले हेच त्यांचे कर्तुत्व होय.

कीवर्ड — डॉ. बाबासाहेब आंबेडकर, हिंदू समाज, स्त्री उन्नती व प्रगती, समानता, स्वातंत्र्य, दुःख, अंधश्रध्दा, समाजिक समानता, कुंठीत अवस्था, मर्यादा, शिक्षण, विषमता, चळवळी.

प्रस्तावणा —

भारताच्या प्राचीन, मध्ययुगीन काळापासून तर १९व्या शकतकापर्यंत भारतीय स्त्री जीवनाचा इतिहास पाहता असे दिसते की, भारतीय स्त्रीवर्गाचा दुय्यम दर्जा, अंधकारमय जीवन, अनीती, कुप्रथाचा वाढलेला कहर होता. या काळातील भारतीय स्त्रीजीवन नरकमय यातना भोगून, दुःखदायी नैराश्यवादी जीवन जगत असे. भारतीय स्त्रीचे जीवन या काळात चूल आणि मूल या संकल्पनेत बंदिस्त होते. भारतीय स्त्री जीवनाचे ज्ञान फक्त चूलीपर्यंत हे भारतीय समाज अभिमानाने म्हणत असे. शिकून काय करणार त्यापेक्षा न शिकता वडिलधारी मंडळीची सेवा करावी, घरकामे करून जीवन सार्थकी लावावे असा म्हणणारा भारतीय समाज होता. भारतीय स्त्री जीवनात किती हसावे, काय पहावे, काय करावे, काय करू नये, असे भारतीय वडिलधारे मुलीला शिकवीत असत. एक मर्यादीत, स्वातंत्र्याचा अभाव असणारे जीवन, भारतीय स्त्री त्याकाळी जगत असे. स्वातंत्र्य म्हणजे काय असते हेच स्त्रीजीवनाला माहित नव्हते.

तेंव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री वर्गाचे दुःख, दैन्य अवस्था जवळून पाहली होती. या दुःखातून, नैराश्यवादी जीवनातून स्त्रीवर्गाला बाहेर काढले पाहिजे ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भुमिका होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते सामाजिक समता प्रस्थापीत करतांना स्त्रीवर्गाला मागे ठेवून चालणार नाही आणि सामाजिक विषमता दूर करायची असेल तर स्त्रीवर्गाला त्यांचे हक्क, अधिकार, स्वातंत्र्य दिले पाहिजे हे आग्रहाने सांगीतले. डॉ. बाबासाहेबांनी सामाजिक समता निर्माण करण्यासाठी स्वातंत्र, समता, बंधूता या मानवतावादी मूल्याचा नवा विचार प्रवाह मांडून स्त्री स्वातंत्र्याच्या प्रगतीच्या, उन्नतीच्या, कार्याला प्रचंड हातभार लावला. शिक्षणा शिवाय तरणोपाय





नाही या सिध्दांता नुसार प्रत्येक भारतीय स्त्री—पुरूषाने शिक्षणातून आपली प्रगती, उन्नती करावी आणि आपले ध्येय जीवन पूर्ण करावे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत असत. त्यांनी भारतीय समाजातील दोषी, अमानवतावादी रूढी परंपरा अंधश्रध्दा पाहिल्यात म्हणून स्त्री वर्गाचे दुःख नाहीसे करण्यासाठी त्यांनी कायदे केले.

शोधनिबंधाचे उदिष्टे —

१) भारतीय स्त्रीवर्गावरील झालेला अन्याय, मुस्काटदाबी, सामाजीक दोषांचा अभ्यास करणे.
२) भारतीय स्त्री जीवनाचे दुःख दैन्य अवस्था, बंधने, कुप्रथा चा अभ्यास करणे व परिस्थितीचे आकलन करणे.
३) डॉ. बाबसाहेब आंबेडकरांच्या विचार, तत्वे, दृष्टीकोनाचा सखोल अभ्यास करून घटनांचा आढावा घेणे.
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले कार्य, संवीधानाच्या तरतूदीचा सखोल अभ्यास करणे.

संशोधन पध्दती व साहित्य —

वरील विषयाला अनूसरून शोधनिबंधासाठी वापरण्यातयेणारे ग्रंथालयातील पुस्तके संदर्भ ग्रंथाचा अभ्यास करून, निष्कर्ष काढून, मांडणी करण्यात येईल. यासाठी ऐतिहासिक संदर्भ ग्रंथ पध्दत संशोधनासाठी वापरली आहे.

विषय संशोधन स्वरूप —

भारताच्या प्राचीन, मध्ययुगीन काळ ते १९ वे शतक पर्यंत स्त्री जीवनाचा आलेख घसरलेला, दुय्यम दिसून येतो. भारतीय स्त्री जीवनाने चाकोरीत रहावे, समाजाचे नियम पाळावे, वडिलधारी मंडळीचे ऐकावे, असे मर्यादीत जीवन जगावे, ही समाजाची अपेक्षा होती. स्त्री जीवन इतका हस्तक्षेप होता की काय पहावे, काय ऐकावे, काय पाहू नये हे शिकवणूकीतून मांडल्या जात असे. स्त्री जवीन जणूकाही एकवस्तू आहे, मेनाचा गोळा आहे असे समजून वागवील्या जात असे. एकप्रकारे गुलामगिरी, दास्यत्व पध्दतीत जीवन जगण्यास समाजाने भाग पाडलेले दिसून येते. बोलतांना सुध्दा मर्यादा पाळावी, मर्यादेत रहावे, वादविवाद करू नये, विचार मांडू नये हे समजून सांगीतले जात असे. भारतीय स्त्री जीवन त्याकाळी चूल आणि मूल या संकल्पनेत जीवन जगत असे. यालाच कुंठीत अवस्था म्हणतात. पति हा परमेश्वर आहे, त्याच्या मर्जीवर जगावे असे परावलंबीत्व त्यावेळी होते. स्त्री जीवनाला हसण्याची, स्पष्ट बोलण्याची मनाई होती. जणूकाही घर म्हणजे कैदखानाच होता. एकूनच स्त्री जीवन प्रतिगामी, दैववादी, निराशावादी होते. रूढी, परंपरा अंधश्रध्दा, कर्मकांडाने तर स्त्री जीवनाची अधोगती घडवून आणलेली दिसते. भारतीय समाज पितृसत्ताक पध्दतीचा असल्याने मातृसत्ताक पध्दत ला दुय्यम जीवन जगणे भाग पडले. स्त्रीवर्गाला इच्छा, भावना नसतात तो एक माणूस आहे हे भारतीय समाजाचे धोरण नव्हते. एकंदरीत स्त्री जीवन सर्व बाजूने बंदीस्त होते.

अशा परिस्थीतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री स्वातंत्र्याचा, स्त्री हक्क, अधिकाराचा विचार, दृष्टीकोन समर्थपणे मांडून स्त्री स्वातंत्र्यासाठी परिवर्तनवादी चळवळी उभारण्याचे महान कार्य केले. स्त्री जीवनाची नवी पहाट घडवून आणण्यासाठी स्त्री स्वातंत्र्याचा हक्क, अधिकार चा संबंध सामाजिक गुलागिरीशी लावून स्त्री—पुरूष समानता चे विचार मांडले. मानवीय दृष्टीकोनातून स्त्री सुधारण घडवून आणण्यासाठी शिक्षणाचे महत्व मांडले. शिक्षणा शिवाय मानवी प्रगती अशक्य आहे हे विचार मांडून शिक्षणाचा संबंध स्त्री उन्नती, प्रगती शी जोडण्याचे कार्य कले. स्त्री वर्गाचे हक्क, अधिकारसाठी त्यांनी अनेक धर्म, तत्व, निष्ठा लोकांना विरोध केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, वैचारिक चळवळी करून समाज प्रबोधन घडवून आनले. डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता बंधूता, न्याय, करूणा, या मूल्याव्दारे स्त्री शोषनाविरूध्द आवाज उठवला. डॉ. आंबेडकरांनी स्त्री जीवनात स्व ची निर्मीती केली. तत्कालीन भारतीय स्त्री उपेक्षीत जीवन जगत असल्याचे चित्र स्वतःहा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहले असल्याने रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, कर्मकांड विरूध्द लेखनाव्दारे सामाजिक प्रबोधन घडवून आनले. पुरूष प्रधानतेत अडकलेल्या स्त्री जीवनाला मानवतावादी दृष्टीकोणातून मनूस्मृती ग्रंथाची होळी केली. कारण मनस्मृती ग्रंथात स्त्री जीवन बंदिस्त केले होते. भारतीय स्त्री वर्गाने कोणाच्या तरी आज्ञेत रहावे असे उदाहरणे दिली होती. भारतीय स्त्री विवाहा नंतर सुध्दा बंदिस्त होती. भारतीय स्त्री जीवनाचे हक्क, अधिकाराला या ग्रंथात ग्रहण

लावले होते. म्हणून स्त्री जीवनाला बाधक ठरणाऱ्या ग्रंथाची त्यांनी होळी केली व स्त्रीवर्गाचा आत्मसन्मान वाढवीला. कारण या ग्रंथात स्त्री वर्गाने कसे जीवन जगावे याचे नियम होते. भारतीय समाजातील अनेक रूढी व कुप्रथा यामध्ये लिहल्या होत्या त्यामूळे स्त्री जीवनाचे स्वातंत्र्य कुंठीत, बाधीत झाले होते. स्त्री वर्गाला संपत्ती आणि इतर अधिकारापासून वंचीत ठेवणाऱ्या मनूस्मृती ग्रंथाची त्यांनी होळी करून स्त्री वर्गाचा मानसन्मान वाढवून स्वाभिमान वाढवीला. आज भारतात सुप्रीमकोर्ट व्दारे अनेक कायदे करण्यात येतात. भारतीय संसद अनेक कायदे करून, घटनादुरूस्ती करते. अशा प्रकारे डॉ. बाबासाहेबांच्या कार्यामूळेच राजकीय, सामाजिक, आर्थिक, मानवजातीचे कल्याणकारी कायदे तयार होत आहेत. आज भारती स्त्री संघटना, संस्था, आपल्या चळवळीव्दारे स्त्री सुधारणा कायदे करण्यासाठी सरकारवर दवावगट निर्माण करत असते. हाच विचार, दृष्टीकोण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा होता. म्हणून बहुसंख्य स्त्री वर्गाचे प्रश्न, समस्या संबंधी कायदे निर्माण झालेले दिसतात.

**स्त्री पुरूष समानता तत्व व स्त्री शिक्षणासंबंधी दृष्टीकोन –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्री जीवनाचे कैवारी आहेत. त्यांनी स्त्री वर्गाच्या उन्नती व प्रगतीसाठी बरेच कायदे केले. स्त्री–पुरूष समानता असावी हे त्यांचे मत होते. म्हणून स्त्री जीवनाला शिक्षण मिळाल्या शिवाय स्त्रीवर्गाची उन्नती व प्रगती होणार नाही हे त्यांना माहित असल्याने त्यांनी स्त्री शिक्षणावर भर देण्याचे कार्य केले. भारतीय समाजातील दोष पाहता त्यांनी सामाजिक दोषा विरूध्द अनेक चळवळी उभारल्या. एक स्त्री अनेक कुटूंबाला शिक्षित करू शकते त्या कुटूंबाची प्रगती करू शकते या धोरणातून डॉ. आंबेडकरांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यांनी स्वातंत्र, समता, बंधूता या तत्वाचा जयघोष करून स्त्रीवर्गाला स्वातंत्र्यपणे जीवन जगण्याचा अधिकार कायदया व्दारे व संवीधानाव्दारे दिला. तसेच स्त्रीवर्गा विरूध्द लेखन करणारे मानवी हक्क अधिकार नाकारणारे सर्व वैदिक ग्रंथाचा त्यांनी विरोध केलेला दिसून येतो.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदूकोड बिल –**

डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांनी स्त्री वर्गाच्या उन्नती व प्रगतीसाठी हिंदू कोडबिल लोकसभेत मांडले या हिंदूकोड बील मध्ये स्त्री वर्गासंबंधी वारसा हंक्क, विवाह संबंधी प्रश्न, पोटगी, मालमत्ता, मालकीची अवस्था, वंशजाचे हंक्क, अधिकार, हिंदू स्त्रियांना समान हंक्क, घटस्फोट, यासंबंधी कायदेकरण्याची तरतूद होती. कारण तेंव्हा स्त्रीवर्गाची बीकट अवस्था पुरूषसत्ताक पध्दतीने होत असे. स्त्रीवर्ग आपल्या जीवनात स्वतंत्र नव्हती. परंतू लोकसभेत तत्कालीन लोकसभा सदस्यानी विरोध केला. त्यामूळे हिंदूकोड बिल स्थगीत करावे लागले. शेवटी भारतीय स्त्री वर्गाला स्वातंत्र्यता, समानता व न्याय देता आले नाही म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायदा मंत्री पदाचा राजीना दिला. नंतर याच धर्तीवर हिंदू विवाह कायदा, हिंदू उत्तराधिकारी कायदा, हिंदू दत्तक कायदा, हिंदू निर्वाह कायदा असे वेगवेगळे कायदे बनवीण्यात आले.

**डॉ. बाबसाहेब आंबेडकर आणि स्त्री वर्गासाठी संवीधान मधील तरतूदी –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री वर्गाच्या उन्नती, प्रगती साठी, स्त्री सक्षमीकरण, स्त्री सवलीकरणासाठी, अंधारात खितपत पडलेल्या, अन्याय, अत्याचार, मुस्काटदाबी, गुलामगिरी सहन करणाऱ्या स्त्री वर्गासाठी, ज्या स्त्रीवर्गाचा कोणीच वाली नव्हता त्या स्त्री वर्गाला शिक्षित करून समानता दर्जा मिळवून देण्यासाठी, मानवाचे मूलभूत हंक्क व अधिकारासाठी, स्त्रीवर्ग खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य व्हावेसाठी, मानसन्मान, माणूसपण, स्त्रीमूक्ती व पुरोगामी साठी, दु:खे नाहीसे होण्यासाठी, स्त्री ही सूध्दा माणूस आहे तीला आपले जीवन जगण्याचा खरा अधिकार आहे साठी 'संवीधान' ची निर्मीती करून त्या मधील कलम, तरतूदी लिखानाव्दारे मांडण्याचे कार्य केले. त्यानुसार

१) कलम १४ – यामध्ये समान स्वंरक्षण, समानता, नैसर्गीक न्याय ची तरतूद आहे.

२) कलम १५ – यामध्ये धर्म, वंश, जाती, लिंग, जन्मस्थान या विषयी भेदभाव करनार नाही ची तरतूद आहे.

३) कलम १६ – यामध्ये लोक नियोजन विषयामध्ये समानता असावी, नोकरी विषयक सेवाशर्ती, संबंधी तरतूदी आहेत.

४) कलम २४ – यामध्ये कामाच्या ठिकाणी, जोखीम असणारे क्षेत्र च्या ठिकाणी मुलगा किंवा मूलगी १४ वर्षापेक्षा वय कमी असेल तर कामावर ठेवु नये ची तरतूदी आहेत.



५) कलम ३९ – यामध्ये स्त्रीवर्ग किंवा पुरूषवर्ग यांना समानता प्रदान करून आपले उपजीवीका ची साधने प्राप्त करण्याचा अधिकार मांडला आहे. समान काम समान वेतन, कामगाराचे कल्याण व आरोग्य, जशी शक्ती तसे काम ची तरतूद आहे.

६) कलम ४२ – कामकाज ठिकाणी समान न्याय, प्रसूतीरजा, पगारी रजा, मानवतावादी उपाययोजना, ची तरतूदी आहेत.

७) कलम ५१ – यामध्ये स्त्री वर्गाचा सन्मान केला पाहिजे, सन्मान विरूध्द काही प्रथा परंपरा असतील तर, त्याग चा अधिकार ची तरतूद आहे.

८) कलम ३२५ – यामध्ये धर्म, वंश, जात, लिंग या कारणास्तव मतदार, मतदान यादीत नाव समाविष्ठ होण्यासाठी किंवा अपात्रता होउ नये संबंधची तरतूदी आहेत.

**स्त्रीवर्ग आणि केलेले कायदे –**

१) हुंडा देणे घेणे बंदी कायदा करण्यात आला.

२) भृणहत्या वर बंदी करणारा कायदा करण्यात आला.

३) लिंग तपासनी होउ नये म्हणून लिंगभेदभाव कायदा करण्यात आला.

४) बालविवाह होउ नये म्हणून बालविवाह बंदी कायदा करण्यात आला.

५) स्त्री वर्गावर अत्याचार, शोषन होउ नये यासाठी कायदा झाला.

६) स्त्री विधवा असेल तर भेदभाव करू नयेसाठी कायदा झाला.

७) इ.स. १९९० मध्ये महिला उन्नती प्रगतीसाठी, राष्ट्रीय महिला आयोग ची स्थापना करण्यात आली.

८) इ.स. १९९२ मध्ये ७३, ७४ वी घटना दुरूस्ती करून पंचायत राज कायदा करून महिलांना नगरपालिका, ग्रामपंचायत, महानगर पालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद मध्ये ३३ टक्के आरक्षण ची तरतूद करून उभे राहणेचा अधिकार देण्यात आला.

९) २१ व्या शतकात विधान सभा, संसद मध्ये आरक्षणाची तरतूद ठेवावी यासाठी महिला वर्गाचा आरक्षणचा संघर्ष चालू आहे.

**निष्कर्ष –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यामूळे आजचा स्त्री वर्ग उन्नती, प्रगती, स्त्री सक्षमीकरण, स्त्री सबलोकरण ची स्वप्ने पूर्ण करत आहे. आज समानता बऱ्याच क्षेत्रात निर्माण झाली आहे. न्याय वागणूक सर्वांना मिळत आहे. जर हिंदू कोड बील पास झाले असते तर स्त्री वर्गाची प्रचंड प्रगती, उन्नती घडून आली असती. आज अनेक क्षेत्रात स्त्री वर्ग मोठया प्रमाणात कार्यरत आहे. त्याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आहे. डॉ. बाबासाहेबांनी संवीधान ची निर्मीती करून खऱ्या अर्थाने समानता, स्वातंत्रता, स्त्री वर्गाला मिळालेली दिसते. आज त्या संवीधानाचा आधार घेउन केंद्र सरकार, राज्य सरकारे स्त्री वार्गसाठी कायदे करीत आहेत. परंतू आजूनही स्त्रीवर्गाचा हंक्क, अधिकार, समानता, स्वातंत्रताचा आवाज थांबला नाही कारण भविष्यात जसे प्रश्न समस्या निर्माण होतील तसेस्त्री सूधारणा ची आवश्यकता राहणार आहे. त्यामूळेच इ.स. १९७५ नंतर स्त्री चळवळी मोठया प्रमाणात वाढल्याचे चित्र समाजात दिसत आहे. इ.स. १९९० नंतर राजकीय क्षेत्रात बरीच जागृती त्या चळवळी मूळेच घडून आली. म्हणून आजची स्त्री स्वत:हाची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे चे चित्र भारतीय समाजात दिसून येत आहे.

**संदर्भ ग्रंथ व टिपा –**

१) गुप्त विश्वप्रसाद, गुप्तमोहिनी २०१२ – भीमराव आंबेडकर व्यक्ति व विचार, राधा पब्लिकेशन्स, दरयिागंज, नई दिल्ली.

२) नाटाणी प्रकाशन नारायण २००७ – महिला संरक्षण एंव न्याय, बूक एनक्लेव शान्तीनगर, जयपूर.

३) डॉ. मनोहर यशवंत २००५ – डॉ. आंबेडकरांनी मनूस्मृती का जाळली, युगसाक्षी प्रकाशन, रिंग रोड, नागपूर

४) डॉ. मनोहर यशवंत २००६ – डॉ. आंबेडकर आणि स्त्रीमूक्तीचे युध्द, युगासाक्षी प्रकाशन, रिंगरोड, नागपूर.

५) खैरमोडे चांगदेव भवानराव १९८७ – डॉ. आंबेडकर आणि हिंदू कोड बिल, सुगावा प्रकाशन, सादाशिवपेठ, पुणे
६) रानडे प्रतिभा २००५ – स्त्री प्रश्नाची चर्चा, पदमगंधा प्रकाशन, पुणे
७) डॉ. कर्वे स्वाती २००८ – स्त्री विकासाचे नवे क्षितीज, प्रतिमा प्रकाशन, पुणे
८) डॉ. कठारे अनिल २०१३ – भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, एज्यूकेशन बूक सप्लायर्स, औरंगाबाद





# चाकमा जनजाति और सामाजिक जीवन

नेहा चंद्रभान गजभीये
:संशोधक:
डॉ. नीरज बोधि
:मार्गदर्शक:
विभाग प्रमुख पाली प्राकृत विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ नागपुर, महाराष्ट्र

सारांश

चाकमा जनजाति जो स्थविरवाद (थेरवाद) बौद्ध धर्म को मानते हैं। जिससे उन्हे सभी चाकमा बौद्ध के रुप मे जानते है। चाकमा जनजाति खुद को शाक्य वंश से मानते हैं। "शाक्य" शब्द का अर्थ समय के साथ विकसित हुआ जिससे उन्हें चाकमा के नाम से जाना जाने लगा। चाकमा जनजाति एक समृद्ध जनजाति है। चाकमा जनजाति बौद्ध परम्परा को अपनाते हैं और यह अपनी संस्कृति, लोककथाओं, साहित्य और परंपराओं को सहेज कर रखते है। सामाजिक रूप से, वे बिना किसी मतभेद के सभी सामाजिक धार्मिक अवसरों में भाग लेते है। चाकमाओं की समृद्ध विरासत का लाभ हमारी सभ्यता और संस्कृति के साथ बौद्ध धर्म को भी हो रहा है। चाकमाओं की सामाजिक व्यवस्था परंपरागत रूप से सहयोग और भाईचारें पर आधारित है, जो बौद्ध धर्म का एक महत्व पूर्ण गुण है। 'बल देना' मतलब किसी जरूरतमंद को सामुदायिक सहायता करना। 'बल देना' के अंतर्गत परिवार के एक सक्षम सदस्य को दूसरों की सहायता के लिए कामकाजी सामग्री के साथ जाना होता है, जैसे झुम खेती, मेला (विवाह), अंतिम संस्कार, मृत्यु के बाद के संस्कार आदि जैसे सभी समारोहों में सहायता करते है। चाकमा बौद्धो मे देखा गया है कि वे जन्म संस्कार बौद्ध पद्धति से ही करते है। 7 वर्ष की आयु पूरी करने के बाद बौद्ध धम्म का मूल नागरिक बनने के लिए प्रत्येक पुरुष बच्चे के लिए न्यूनतम सात, नौ, या ग्यारह दिनों के लिए चमांही/गोइन्सयांग/श्रमण एक नौ सिखिया (अस्थायी भिक्षु- श्रामणेर) बनना अनिवार्य है। चाकमा बौद्धो मे (मेला) विवाह समाज की मान्यता से हि वैध होता है। विवाह समारोह को चुमुलॉन्ग के नाम से जाना जाता है और विवाह समारोह भिक्षुओं से फ़रीख (सुत्त) सुनने के साथ होना चाहिए। चाकमा जनजाति में विवाह समारोह की दो प्रणालियाँ हैं। धार्मिक और पारंपरिक दो विधियाँ होती हैं। चाकमा जनजाति में मृत्यु संस्कार भी बौद्ध परंपरा से ही किया जाता है। मृतक का अंतिम संस्कार भिक्षु संघ गाथा और सुत्त पठन करने के बाद ही शव को अग्नि दी जाती है और सात दिनों बाद पुण्यनमोदन संस्कार में भी भिक्षु संग आते है और मंगलसुत्त सुनाते है। भिक्षु संग धर्म उपदेश देते है। जिससे मृतक के परिवारजनों को बुद्ध के धम्म में दी गई अनित्यता का पता चले और उनके प्रियो के वियोग का दुःख थोड़ा कम हो जाये। इस तरह से देखा गया है कि चाकमा बौद्ध जनजाति का सामाजिक जीवन समृद्ध जीवन है।

## प्रस्तावना

चाकमा जनजाति उन पहाड़ी जनजातियों में से एक हैं, जो स्थविरवाद (थेरवाद) बौद्ध धर्म को मानते हैं। जन्म से जीवन के अंतिम समय तक होने वाले सभी प्रकार के संस्कार या सभी प्रकार की परंपरा स्थविरवाद परम्परा के आधार पर ही होती है। चाकमा जनजाति मुख्य रूप से बांग्लादेश के चटगांव के पहाड़ी इलाकों, भारत में मिजोरम, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, असम और पश्चिम बंगाल राज्यों तथा म्यांमार की अराकान पहाड़ियों में पाए जाते हैं। आचार्य बुद्ध धर्म सुत्त और महापदान सुत्त के अनुसार जिन लोगों ने भगवान बुद्ध के शैली को अपनाया एवम् भगवान बुद्ध के अनुयायी बने उन सभी लोगों को शाक्य कहा गया।

Impact Factor-8.632, (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## October -2023

ISSUE No - (CDXXXI ) 431 -C



**"Contribution of Pre-Independence & Post-Independence Reformers & Reform Movements to Indian Renaissance (1818 AD to 2020 AD)"**



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
Aadhar Social Research & Development Training Institute Amravati

**Dr. S. M. Jogdand**
( I/C Principal)
Shri Shivaji College of Art's, Comm. & Sci., Kandhar, Dist.Nanded

**Dr. Vijaya K. Sakhare**
Dept. of History
(UG,PG & Research Centre)
Shri Shivaji College of Art's, Comm. & Sci., Kandhar, Dist.Nanded

**This Journal is indexed in :**
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | १९ व्या शतकातील समाजसुधारणा चळवळी | प्रा. आदित्य पांगे | 1 |
| 2 | विधवा पुनर्विवाह चळवळीची मीमांसा | बिपीनकुमार रामलू कर्णे | 7 |
| 3 | सत्यशोधक चळवळीतील प्रमुख स्त्रिया व त्यांचे कार्य | धैर्यशील मारुती जाधव | 11 |
| 4 | स्वातंत्र्यपूर्व काळातील सुधारक : महात्मा ज्योतिराव फुले | प्रा.डॉ.आनंदा पांडुरंग कांबळे | 15 |
| 5 | महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती चळवळीतील प्रमुख महिला नेतृत्व | डॉ. डी. एस. पटवारी | 18 |
| 6 | अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेची भूमिका | डॉ.ए.बी. जाधव | 24 |
| 7 | स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री सुधारणा चळवळीचे स्वरुप | डॉ. एन. आर. वर्मा | 27 |
| 8 | म. फुलेंच्या सत्यशोधक समाजाचा विसाव्या शतकात पडलेला प्रभाव | डॉ.महेंद्र मोतीराम इंगळे | 31 |
| 9 | आचार्य बाळशास्त्री जांभेकर | डॉ. नामदेव कृष्णा मोळे | 35 |
| 10 | भारतीय महिलांच्या उत्थानात महाराज सयाजीराव गायकवाड यांचे योगदान | डॉ.निशांत भिमरावजी शेंडे | 39 |
| 11 | पंडिता रमाबाई यांचे सामाजिक सुधारणेतील योगदान एक अभ्यास | प्रा.डॉ.रामभाऊ देवराव काशीद | 44 |
| 12 | हैदराबाद मुक्तिसंग्राम आणि स्वातंत्र्यसेनानी श्री.मल्लिकार्जुन चाकोते | डॉ.सचिन उत्तमराव हंचाटे | 48 |
| 13 | महाराष्ट्रातील समाज सुधारणा चळवळ - 'सुधारक' वर्तमान पत्राचे योगदान | डॉ.संतोष सुधाकरराव कोटुरवार | 52 |
| 14 | स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री मुक्ती सुधारक | डॉ.शिवाजी सोमला पवार | 55 |
| 15 | समाजसुधारक पंडिता रमाबाई | डॉ.सुचिता निवृत्ती किडीले | 67 |
| 16 | स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री मुक्ती सुधारक - पुष्पा भावे | डॉ सुवर्णा प्रकाश पाटील | 69 |
| 17 | म. ज्योतीराव फुले यांचे शेतकरी आणि शेती विषयक विचार | डॉ.चव्हाण सुखदेव गोविंदराव | 72 |
| 18 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य | डॉ.वसंत निवृत्ती बंडे | 76 |
| 19 | महात्मा जोतिबा फुले यांचे सामाजिक कार्य | डॉ. तांबारे विजयकुमार गणपतराव | 80 |
| 20 | स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीमुक्ती सुधारणा चळवळी | डॉ.गंगाधर बालाजीराव देशमुख | 85 |
| 21 | महात्मा फुले : मूलभूत सामाजिक परिवर्तनाची चळवळ आणि विचार | डॉ. जनार्दन श्रीकांत जाधव | 91 |
| 22 | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य | लेफ्ट. डॉ.पावडे खोब्राजी वामनराव | 96 |
| 23 | २० व्या शतकातील हैद्राबाद संस्थानातील शैक्षणिक चळवळ (विशेषत: मराठवाडा) | डॉ. एम. डी. दामाजीवाले | 100 |
| 24 | संघर्षाची यशोगाथा - सावित्रीबाई ज्योतिराव फुले | डॉ. संजीवनी बारहाते (जवादे) | 104 |
| 25 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : भारतीय संविधानाचे जनक | डॉ. उषाताई लक्ष्मण मगरे | 109 |
| 26 | पेरियार ई व्ही रामास्वामी नायकर यांचे कार्य | गजानन किसन जुमडे | 113 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य आणि विचार | प्रितम धोंडिबा टिळक ,प्रा.डॉ. लक्ष्मीकांत जिरेवाड | 122 |
| 28 | महिला सबलीकरण कार्यक्रमाचे अध्ययन | श्रीमती सीमा जालिंदर भोसले | 124 |
| 29 | भारतीय अर्थव्यवस्थेत कोव्हिड-१९ चा कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रावरील परिणाम | मनिषा महादेव मस्के ,प्रा.डॉ.रत्नाकर आर. कांबळे | 128 |
| 30 | भारतीय स्त्री सुधारणा, सुधारक व कायदे | प्रा.सौ. संगीता सदानंद स्वामी | 131 |
| 31 | नेहरूंच्या लोकशाही समाजवाद व विद्यमान परिस्थिती | स्वाती व्ही. पाटील | 134 |
| 32 | महर्षी धों. के. कर्वे यांचे विधवा पुनर्विवाहाबाबत कार्य व त्याचे स्त्रीजीवनावर झालेले परिणाम | श्री दराडे नवनाथ एकनाथ ,डॉ. सविता गंगाधरराव मुंढे | 137 |
| 33 | सत्यस्वरुप सगुणाबाई क्षीरसागर यांचे सत्यशोधक चळवळीतील योगदान | डॉ.अनिता व्यंकटराव शिंदे | 141 |
| 34 | महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार व कार्य | डॉ. एच. टी. सातपुते | 144 |
| 35 | स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील ब्रिटिश व भारत सरकारचे स्त्री उद्धाराचे कार्य | डॉ.शारदा गोविंदराव बंडे | 147 |
| 36 | सामाजिक जाणीव असणारे समाजसुधारक : गोपाळ हरी देशमुख | प्रा. डॉ. सोमनाथ गुंजकर | 150 |
| 37 | स्त्रीमुक्ती सुधारक, सुधारणा चळवळी आणि मराठीतील स्त्रीवादी विचार | डॉ. वंदना माधव चव्हाण | 154 |
| 38 | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक सुधारणेतील योगदान | प्रा.राजकुमार ज्ञानोबा घाटे | 162 |

शेती, व्यवसाय, समान व्यवस्था, राजकारण, संस्कृती या क्षेत्रात जागृतीघडविण्याचे काम अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेने केले ते महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता महाराष्ट्राच्या बाहेर देखील संस्थेचे कार्य चालू राहिले.

'सत्यशोधक समाजाचे दुसरे अधिवेशन नाशिक (1912) येथे झाले, या अधिवेशनाचे अध्यक्ष व स्वागताध्यक्षांच्या भाषणासह व्यापक प्रसिद्धी दीनबंधुने दिली. मराठा शिक्षण परिषद, मराठा विद्यार्थी संमेलन, मुस्लिम शिक्षण परिषद यांच्या अधिवेशनांना व ठरावांना प्रसिद्धी दिली.' (उगले जी.व. (2009) पृ.28) धार्मिक व सामाजिक जोखंडातून मुक्त होऊन प्रगतीला योग्य वातावरण,शिक्षणाच्या रूपाने संधी मिळाली. सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीने मराठा इतिहास परिषदेच्या कामामध्ये हातभार लावलेला दिसून येतो.

समारोप :

महाराष्ट्रातील बऱ्याच शैक्षणिक संस्थांचा संबंध परिषदेशी होता. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद ही एक संस्था न राहता ती एक चळवळ बनली. वंचित समाजासाठी तिने भरीव काम केले. पुढे या संस्थेच्या कामामुळे अनेक क्षेत्रांमध्ये काम करणारे कार्यकर्ते तयार झाले. मराठा समाजामध्ये झालेल्या जनजागृती मध्ये या परिषदेचे कार्य महत्वाचे होते. या परिषदेच्या कामकाजात सर्वसामान्या पासून संस्थानिकांनीही भाग घेतला. बहुतांशी समाज हा शेती करणारा आहे हे ध्यानात घेऊनच कृषीच्या अनुषंघाने शिक्षण देण्यासाठी लक्ष दिले गेले. महाराष्ट्राच्या सर्वांगीण जडण-घडणी मध्ये या परिषदेने महत्वाची भूमिका बजावली. परिषदेच्या अधिवेशनात सामाजिक सुधारणांना प्राधान्य दिले गेले. मराठा शिक्षण परिषदेचे सुरू केलेले काम एका जातीपुरते मर्यादित न राहता समाजातील वंचित घटकांना सोबत घेऊन पुढे गेले. मराठा शिक्षण परिषदेने पहिल्यापासूनच बहुजन समाजाच्या शिक्षणाचा व्यापक दृष्टीकोन ठेवला होता.

संदर्भ:

1) पाटील मुकुंदराव (2009) विचारकिरण दोन मित्रमधील अग्रलेख,1910-15, संपादक उमेश बगाडे, प्रकाशक – दोन मित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समिती,अहमदनगर.

2) इंगवले शोभा वा.20.16 अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद : स्वरूप आणि कार्य, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.

3) गोळे रामराव (1990-2002), खंड-1, मराठा सेवा संघ.

4) देशमुख व.वा. (2007)अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद शताब्दी महोत्सव.

5) शिंदे माधवराव (2005) विजयी मराठकार श्रीपतराव शिंदे, संपादक – पवार जयसिंगराव, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी.

6) उगले जी.ए. (2009) दीन बंधु आणि तानुबाई बिर्जे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.





# स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री सुधारणा चळवळीचे स्वरुप

डॉ. एन. आर. वर्मा
इतिहास विभाग प्रमुख श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद, जि.यवतमाळ.
मो.9420773203

सारांश--

भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक व्यवस्थेत प्रचंड दोष होते. भारतीय समाज दैववादी, अंधश्रध्दाळू, परंपरा आणि कर्मकांड यांना महत्व देऊन कुप्रथा पाळणारा होता. याचे कारण भारतात शिक्षणाचा अभाव असल्याने अशिक्षित जनतेला रुढी व परंपराचे मूल्य फार वाटत असे. म्हणूनच स्त्रीवर्गाचे जीवन अंधकारमय होते. स्त्रीवर्गाची या काळात प्रचंड हानी झाली. स्त्रीवर्गाला या काळात स्वातंत्र्य म्हणजे काय, मानवी हक्क, अधिकार कशाला म्हणतात याचीजाणीवच नव्हती. स्त्रीवर्गासाठी हा काळ नरकमय यातना देणारा, दुःखदायी, नैराश्यवादी होता.

परंतू ब्रिटिश राजवटीत इंग्रजांनी इंग्रजी शिक्षणाची सुरुवात केल्याने बऱ्याच समाज सुधारकांनी इंग्रजी शिक्षण घेऊन स्वातंत्र्य, समानता, लोकशाही ची मूल्ये शिकून भारतीय समाजव्यवस्थेत जागृती, परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. त्यांना शिक्षणामुळे भारतीय स्त्रीवर्गाची स्थिती अत्यंत वाईट आहे याची जाणीव झाली. म्हणून शिक्षित लोकांनी, समाज सुधारकांनी आपल्या शब्दातून, लेखनीव्दारे, व्यासपीठाव्दारे, लेखाव्दारे स्त्री वर्गाची दशा, स्थितीचे वर्णन करुन आता तरी स्त्रीवर्गाला न्याय द्या ची भाषा वापरली. कारण भारतातील पुरुषप्रधानता स्त्रीवर्गासाठी दुःखदायी होता. स्त्री वर्गाने आपले जीवन बाजूला सारुन, दुःखे विसरुन, कुटूंबासाठी त्याग करावा, समर्पण करावे, कुटूंबाची काळजी घ्यावी, चूल व मूल या संकल्पनेत राहून परंपरा चे पालन करुन जीवन जगावे हा समाज मंत्र दिला होता. शेवटी शिक्षणातून, समाज सुधारकांच्या कार्यातून, चळवळीतून, वृत्तपत्रांच्या प्रसारातून हळूवारपणे स्त्री सुधारणा चळवळीला गती प्राप्त झाली आणि स्त्री स्वातंत्र्यतेची पहाट ला सुरुवात झाली शेवटी 20 व्या शतकात जागृतीतून स्त्री वर्ग आपले हक्क, अधिकारसाठी सज्ज होऊन आपली प्रतिमा मांडू लागली.

प्रस्तावना –

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक इतिहासाचा अभ्यास करतांना स्त्रीवाद ची व्यापक चर्चा केली जाते. कारण भारतीय समाजात स्त्री वर्गाची भुमिका दूय्यम स्वरुपात मांडलेली साहित्याव्दारे दिसून येते. वास्तवीकपाहता इ.स. 1818 मध्ये पेशवाई समाप्त झाली आणि भारतीय समाजात इंग्रजांनी इंग्रजी शिक्षणाच्या माध्यमातुन बरेच परिवर्तन घडवून आनले. या परिवर्तनवादी विचारसारणीत जातीभेद, धर्मभेद, मुर्ति पूजा, रुढी, परंपरा, कर्मकांड, अंधश्रध्दा याचे खरे मोजमाप सुरु झाले. आपन काय स्विकारावे, आपन काय सोडावे, कसे रहावे, रुढी, परंपरा कितपत मान्य करावेत याची चर्चा सुरु झाली. यामधून स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री सुधारणा चळवळीचे स्वरुप दिसून आले. ते पुढील प्रमाणे.

विषय संशोधन स्वरुप –

19 व्या शतकातील स्त्री जीवन दर्शन –

19 व्या शतकात स्त्री वर्गा बददल बरेच चिंतन, मनन, आत्मपरिक्षण करण्यात येऊन परंपरागत मूल्ये चे स्वरुप पाहणे म्हणजे वडिलधारी मंडळीचे, शास्त्रमंडळीचे चिंतन करणे होय. कारण 19 व्या शतकात भारतीय समाज प्रतिगामी, रुढी, प्रथावादी, धर्म परायनता वादी आणि देववादी होता भारतीय स्त्री जीवनात कसे रहावे, काय पहावे,

काय पाहू नये, किती प्रमाणातऐकावे, कसे मूके रहावे, काय करु नये याचे समीकरण होते. भारतीय स्त्री म्हणजे एक वस्तू, एकमेणाचा गोळा, एक घरकाम करणारी मुकी, बहरी, आंधळी स्त्री होय. भारतीय समाजाच्या चौकटीत राहून, लक्ष्मणरेषा न ओलांडणारी स्त्री होय. स्त्री वर्गाला इच्छा, आकांक्षा, मन, भावना नसावी असे समाजाचे सूत्र होते. चूल आणि मूल या संकल्पनाव्दारे जीवन जगून 19 व्या शतकातील स्त्री वर्गाने घराची कामे करावी, काहीच बोलू नये, उंबरठा ओलांडू नये, सासु-सासरे, घरातील मंडळीची मर्जी संपादन करुन, सेवा करुन, पती साक्षात परमेश्वर या संकल्पनेत जगणारी स्त्री होय. या भारतीय स्त्री ने हसू नये, सामाजाविरुध्द बोलू नये, घरातील लक्ष्मणरेषा ओलांडू नये, अपशब्द, अमर्यादा या शब्दाचा वापर करु नये, रुढीवादी, धर्मवादी, दैववादी, नशिबाला मानणारी असावे. स्त्री वर्गाचे ज्ञान म्हणजे चूली पूरते असावेत. पतिशिवाय तिच्या जीवनात गतीनाही या संकल्पनेत शिकू नये, चांगले कपडे घालू नये, दुसऱ्याच्या घरी विचारुन जाणे, नकार देऊ नये हे शिकवील्या जात असे. या काळातील स्त्री वर्गाला शिक्षण म्हणजे काय हेच माहित नव्हते. कारण भारतीय समाज स्त्री शिक्षणा विरुध्द होता. स्त्री वर्गाने वृध्दीने चर्चा करु नये, पुस्तके वाचू नये, कागदात काय लिहले हे सुध्दा पाहू नये या विचाराला समाज मान्यता होता. फक्त स्वयंपाक घरातील कार्यकरावीत, डाळ, तांदूळ निवडणे, देवकार्य करणे, आवरुन पांघरुन पाहणे, याकडे समाजाचे, घरातील मंडळीचे लक्ष असायचे. लहानपणापासून स्त्री वर्गाला काय करु नये, काय पाहू नये याचे प्रशिक्षण दिले जात असे. हसने, खिदळणे, विचार व्यक्त करणे समाज मान्य नव्हते. एखादया मूलीने पुस्तक वाचले, लिहले तर समाज पापमूलक मानत असे. इतकेच नव्हे तर स्त्री वर्गाने शुध्द, स्पष्ट बोलू नये, पुरुषांच्या आवडी निवडी ला मान्य करुन आपले जीवन जगावे हे समाजाचे समीकरण होते. शास्त्रात हे लिहले, समाजाचे हे नियम स्त्री वर्गाला मान्य करावेच लागत असे. बाजारात जावे की नाही, जर गेले तर काय घ्यावे हे सुध्दा विचारुन कार्य करावेलागत असे. वर्तमानपत्रात एखादया मूलीचा शिक्षणा संदर्भात लेख आला तर घराची अमर्यादा आली, गुन्हा झाला असे तीला वागवीले जात असे. म्हणजेच 19 व्या शतकात स्त्री वर्गाला मान्य, शब्द प्रमान्य, रुढी परंपरा कर्मकांड अंधश्रध्दा ला मान देणे प्रमाणे होते.

म्हणूनच श्रीमती काशिबाई कानिटकर आत्मचरित्र आणि चरित्र या पुस्तकात डॉ. सरोजिनी बाबर लिहतात की, त्या काळातील स्त्री जीवन डाळ, तांदूळ, निवडणे, भाजी चिरणे, ताटात जिन्नस वाढणे, घर संभाळणे याकडे घरातील मंडळी लक्ष देत असत. श्रीमती रमाबाई रानडे "आमच्या आयुष्यातील काही आठवणी" मध्ये लिहतात की जर स्त्रीने पुस्तक हातात घेतले तर घरात स्त्री मंडळी खमंग चर्चा करुन त्या स्त्रीचा उपहास करुन टाकून बोलल्या जात असे. जर स्त्रीवर्गाला शिकवीले तर पुरुषांनी काय करावे घराची कामे कोण करणार, संसार कसा चालणार, घराची व्यवस्था कोण पाहणार, स्त्रियांना शिक्षण कोणत्याकामचे हे वडीलधारे मंडळी बोलत असत. कारण शिक्षित स्त्री पतिशी उध्दटपणे वागेल ही भिती समाजाला होती.

एकंदरीत 19 व्या शतकातील भारतीय समाज व्यवस्था स्त्री जीवनाकडे प्रतिगामी, परंपरावादी, रुढी बंध्र वादी, दैववादी, दृष्टीकोनातून पहात असे. काय बोलावे, काय बोलू नये याकडे जास्त लक्ष ठेवणारा होता. म्हणजेच ती आपली वस्तू तीला मन, इच्छा, भावना, नाही या प्रमाणे पाहणारा होता. असा हा दुःखदायी, नैराश्यवादी काळ होता.

**स्त्रीसुधारणा चळवळी चे स्वरुप (19 वे शतक) –**

19 व्या शतकात स्त्री सुधारणा हळूवारपणे जागृत होऊ लागली. पुरुष व स्त्री सुधारकांनी आपआपल्या कार्यातून, व्यासपीठावर आलपे विचार, मूल्ये, तत्वे मांडून स्त्रीजीवनाचे हक्क अधिकार ची चर्चा घडवून आनली. गोपाळ गणेश आगरकर यांनी 'सुधारक' पत्राव्दारे लेखनीव्दारे स्त्री सुधारणा बाबत व्यापक आवाज उठवीण्याचे कार्य केले. बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' पत्राव्दारे आपले विचार लेख मांडले. विष्णूशास्त्री पंडीत यांनी विधवांचे पूर्नविवाह व्हावे यासाठी अनूकूल मत मांडले. लोकहितवादी नी 'शतपत्राव्दारे' स्त्रीसुधारणा संदर्भात जागृती घडवून





आनली. इ.स. 1848 मध्ये म. फूले यांनी पुण्यात मूलींसाठी पहिली शाळा काढून स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला, त्यांनी स्व:ताहा शिकून आपली पत्नी सौ. सावित्रीबाई फूले यांना शिकवीले आणि शिक्षिका केले. भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री शिक्षण, विधवा शिक्षण, विधवांचे पुर्नविवाह संदर्भात कार्य करुन स्त्री शिक्षणाला प्रचंड गती देण्याचे कार्य केले. त्यांनी स्व:ताहा एका विधवेशी पूर्नविवाह करुन समाजासमोर सुधारणेचा आदर्शवाद निर्माण केला.

ब्रिटिश राजवटीत इंग्रजांनी असंख्य शाळा, महाविदयालये स्थापन करुन स्त्री शिक्षणा बाबत पुढाकार घेतला. गोविंदराव कानिटकर यांनी सौ. काशिबाई कानिटकर यांना शिकवीले कारण पत्नी शिक्षित असेल तर संसार करणे सक्य आहे हा दृष्टीकोन बाळगला होता. न्या. रानडे यांनी आपली पत्नीश्रीमती रमाबाई रानडे यांना शिकविले. या काळात एका स्त्रीने विवाहनंतर शिकणे म्हणजे महापाप असे समजले जात असे. कारण घरातील स्त्रीवर्ग विवाहीत स्त्रीला शिकवीण्यासाठी प्रचंड ओरड करुन नकारात्मक वातावरण निर्माण करीत असे आणि नावे ठेवीत असे. पण पतीची इच्छा म्हणून त्या काळातही स्त्रीवर्ग शिकला. कारण त्यांचे पति सुधारक वृत्तीचे होते. सुधाताई करंदिकर विधवा झाल्यावर त्यांचे सासरे साने यांनी आपल्या विधवा सुनेला शिकवीण्यासाठी प्रोत्साहीत केले. त्या काळात विधवेला शिकवीणे फार मोठे कठीन कार्य होते. भारतीय समाजात स्व:ताहाचे अपयश झाकण्यासाठी काही मंडळी स्त्री शिक्षणाला पूर्न विवाहाला विरोध करीत असे. कारण समाजाला अश्रू ढाळणारी, अबोल, दुःखी, मुकाटपाने सर्व सहन करणारी, सोशिक स्त्री पाहिजे होती. हा काळ कुप्रथा, परंपरेचा असल्याने बरेच बाल विवाह, बाल जरठ विवाह सुध्दा घडून आले. गोपाळराव जोशी यांनी आपली पत्नीसौ. आनंदीबाई जोशी यांना डॉक्टरकी शिकविण्यासाठी अमेरिकेला पाठवीले. पण अनेक वेळा तं स्त्री शिक्षणा ला दुषणे देत असत.

भारतीय स्त्री सुधारणेसाठी सर्वप्रथम ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री पुरुष तुलना' या पुस्तकाव्दारे स्त्रीवर्गावरील अन्याय, अत्याचार विरुध्द आवाज उठवून आपल्या लेखनीव्दारे स्त्री वर्गाच्या परावलंबात्वेला कोण जबाबदार हा प्रश्न केला. पुरुषवर्गाने आपली मानसीकता बदलावी यासाठी मार्मीक प्रश्न उपस्थित केले. पंडीता रमाबाई यांनी 'स्त्री धर्मनिती' या पुस्तकाव्दारे स्त्री वर्गाचे दुःख मांडले. आता तरी स्त्री वर्गाने खंबीर व्हावे, गप्प बसूनका, कामाला लागा, बरोबरीत या, परावलंबत्वसोडा ही शिकवण देऊन स्त्री वर्गाने स्त्री शिक्षण घ्यावे या आग्रह केला. पं. रमाबाई यांनी आर्य महिला समाजाची स्थापना करुन स्त्री शिक्षणा बाबत आग्रही भुमिका मांडली. त्यांनी 'शारदासदन' स्थापन करुन विधवांच्या शिक्षणासाठी, राहण्यासाठी बरेच परिश्रम घेतले. पं. रमाबाई मुळे अनेक विधवा स्त्रिया शिक्षीत झाल्या. विवाहाचे वय वाढावे यासाठी 'संमतीवय' ची चळवळ पुण्यात मोठ्या प्रमाणातसुरु झाली तेव्हा पं. रमाबाईनी आपले मत मांडून पाठींबा दिला, सौ. सावित्रीबाई फूले यांनी स्त्री शिक्षणासाठी भारतीय समाजातील बऱ्याच लोकांची टिका सहन केली. तत्कालीन समाज त्यांना बऱ्याच वाईट शब्दांनी बोलत असे. श्रीमती यशोदाबाई आगरकर यांनी सुध्दा केशवपन करण्यास स्पष्ट नकार देऊन केशवपन परंपरा विरुध्द आवाज उठवीला. आपले पति गोपाळ गणेश आगरकर यांच्या कार्याला मदत केली. तर म. फूले यांनी विधवांचे केशवपन केले जाऊ नये म्हणून न्हावी लोकांचा संप घडवून आनला. स्त्री पुरुष दोघेही मानवी अधिकारास पात्र तेव्हा स्त्री वर्गाला वेगळा न्याय नको या संदर्भात संताप व्यक्त केला आणि स्त्री वर्गाच्या अनिष्ठ प्रथा विरोधात आवाज उठवीण्याचे कार्य केले.

20 व्या शतकात हळूवारपणे स्त्री शिक्षणाच्या परिणामातून स्त्रीवर्ग शिक्षण घेऊन जागृत होवू लागला. इ.स. 1909 मध्ये श्रीमती रमाबाई रानडे यांनी सेवासदन सुरु करुन स्त्री वर्गाला शिक्षणासोबत व्यावसायीक शिक्षण दिल्या जाऊ लागले. इ.स. 1924 मध्ये शारदा कायदा पास झाल्यावर मुला-मूलींच्या विवाहचे वय वाढले. ब्रिटिशकाळात लार्ड कर्झन यांन स्त्री शिक्षणावर भर दिल्याने शाळा, महाविदयालये स्थापन झाले. इ.स. 1916 मध्ये भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री शिक्षणासाठी भारत वर्षीय महिला विदयापीठाची स्थापना पुणे या ठिकाणी केली. त्या

विद्यापीठात मातृभाषेत सोबत स्त्री वर्गांच्या जीवनाला आवश्यक विषय घेण्यास सुरुवात झाली. महर्षी कर्वे यांनी स्त्री शिक्षणावर मोठ्या प्रमाणात भर देऊन स्त्री उन्नतीकडे लक्ष दिले.

इ.स. 1929 मध्ये इंग्रजांनी सतीप्रथा बंदी कायदा पास केला. त्या विरुद्ध भारतीय समाजाने इंग्रजांच्या धोरणावर प्रचंड टिका करुन जागृती घडवून आनली. सौ. आनंदीबाई कर्वे यांनी माझे पुराण यापुस्तकात समाजातील रोष, वाईट परंपरा की उदाहरणे दिली. भारतीय समाजाने महर्षी कर्वे व सौ. आनंदीबाई कर्वे यांना बहिष्कृत केले होते याचेही उदाहरणे दिली. 20 व्या शतकात लो. टिळक यांच्या राष्ट्रीय चळवळीत बऱ्याच स्त्री वर्गाने पाठींबा देऊन कार्य केले.

म. गांधी युगात म. गांधी यांनी असंख्य स्त्री वर्गाला आपल्या राष्ट्रीय चळवळ कार्यात बाहेर घेण्यासाठी प्रोत्साहीत केले. म. गांधीच्या प्रोत्साहनातून असंख्य स्त्री वर्ग सत्याग्रह, चळवळी मध्ये कार्य करु लागला. म्हणूनच स्त्री-पुरुष राष्ट्रीय चळवळीत खंद्याला खांदा लावून कार्य करीत असे. अशाप्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळात हळूवारपणे स्त्री सुधारणा चळवळींना गती प्राप्त झालेली दिसून येते.

निष्कर्ष –

स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतीय समाजव्यवस्थेत रुढी, परंपरा, अंधश्रध्दा, कर्मकांड, कुप्रथा, या प्रचंड बोलबाला होता. म्हणून भारतीय समाजाच्या व्यवस्थेत स्त्रीवर्गाला एक मुलगी, एकपत्नी, एक आई, सासू, या भूमिकेत जीवन जगावे लागत असे. स्त्रियांचे संपूर्ण जीवन बंधनाच्या दरी आधीन, छायेत जगावे लागत असे. स्त्रीवर्गाने आपले जीवन आपले अस्तित्व विसरुन कुटूंबासाठी त्याग, सेवा, समर्पण मध्ये घालवले पाहिजे असा समाजाचा दंडक होता. एक प्रकारे स्त्री वर्ग गुलाम, दासिक, मुक व मूक, अशा अवस्थेत कुंठीत जीवन जगत असे. म्हणूनच स्त्री वर्ग पुरुष प्रधान व्यवस्थेची मानसिकता करुन सर्वाधिकार होते. स्त्रीवर्गाला मानवी हक्क व अधिकार नव्हतेच. जीवन जगण्याचा हक्क नव्हताच.

पण ब्रिटीश राजवटीतील शिक्षण व्यवस्थेतून समाज सुधारकांनी शिक्षण घेऊन स्त्रीवर्गावरील अन्याय, अत्याचार, हुंडा, मुस्कटदाबी, शोषण विरुद्ध आवाज उठवून, लेखणीद्वारे प्रबोधन करुन, मते, विचार मांडून समाजात स्त्री सुधारणेची मुल्ये रुजवली. स्त्री सुध्दा माणूस आहे तीला आपले जीवन जगण्याचा अधिकार आहे हा आत्मविश्वास निर्माण केला. स्त्री वर्गाला समानता, स्वातंत्र्याची समान संधी या संकल्प केला. त्यामधून स्त्री सुधारणेचा श्रीगणेशा स्वातंत्र्यपूर्व काळात झालेला दिसून येतो. शेवटी स्त्री-पुरुष सर्वांना मानवी अधिकार या उपयोग घेऊन स्त्री सन्मान नी व्याख्या तयार होण्यास प्रारंभ झालेला दिसतो. यातून स्त्री स्वातंत्र्येची पहाट निर्माण होऊन स्त्री वर्ग आपले हक्क, अधिकारासाठी संघर्षरत राहून स्त्री सुधारणा चळवळीला खरी गती प्राप्त झाली.

संदर्भ ग्रंथ –

1) पानसे प्रतिमा (2005) – स्त्री प्रश्नांची चर्चा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे
2) पानसे रमाबाई (2012) – आमच्या आयुष्यातील काही आठवणी, समन्वयक प्रकाशन, कोल्हापूर
3) डॉ. कर्वे स्वाती (2008) – स्त्री विकासाचे नवे क्षितीज, प्रतिमा प्रकाशन, पुणे
4) संपादक (2012) – मिळून साऱ्याजणी (मासिक मार्च 2012)
5) भडंग रमाबाई (1967) – स्त्री धर्मनिती, साधना प्रकाशन, पुणे
6) डॉ. बाबर सरोजिनी (1968) – स्त्री शिक्षणाची वाटचाल, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.
7) कर्वे सौ. आनंदीबाई (1944) – माझे पुराण, केशव इवळे, श्री समर्थ सदन, मुंबई
8) वैद्य सरोजिनी (1980) - श्रीमती काशिबाई कानिटकर आत्मचरित्र आणि चरित्र, पॉप्युलर प्रकाशन मुंबई.





# म. फुलेंच्या सत्यशोधक समाजाचा विसाव्या शतकात पडलेला प्रभाव

डॉ.महेंद्र मोतीराम इंगळे
कै.डॉ. शंकरराव सातव महाविद्यालय,कळमनुरी, जि. हिंगोली

प्रस्तावना :-

19 वे शतक हे भारतात सुधारणा चळवळींचे शतक म्हणून ओळखले जाते. ह्याच काळात भारतात अनेक सामाजिक सुधारणा चळवळींच्या स्थापना झाल्या. त्यामध्ये प्रामुख्याने ब्राम्हो समाज, आर्य समाजाचा उल्लेख करावा लागेल. महात्मा ज्योतीबा फुलेंनी 24 सप्टेंबर 1873 मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून फुल्यांनी महाराष्ट्रात मोठी चळवळ उभी केली. चळवळीच्या माध्यमातून फुले निर्मिकाचा धर्म सत्य आहे. निर्मिकांना फुलेंनी देव किंवा निसर्ग म्हटले आहे. निसर्ग किंवा ईश्वर भेदभाव करीत नाही. परंतु तत्कालीन परिस्थितीत महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात चातुरवर्ण व्यवस्थेचा प्रभाव दिसून येतो. महात्मा फुलेंनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. पुरोहीत वर्गाला विरोध करतात, स्त्री-पुरुष समानता निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. म. फुलेंचा सत्यशोधक समाजाच्या प्रभावामुळे महाराष्ट्रात दोन युग पुरुषांची निर्मिती झाली. छत्रपती शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुल्यांचे वारस म्हणून महाराष्ट्रात परिचित आहेत.

सत्यशोधक समाजाची स्थापना व अर्थ :-

समाजप्रबोधन करावयाचे असेल तर आधुनिक विचार करणाऱ्या तरुणांचे संघटन झाले पाहिजे. त्याशिवाय समाज परिवर्तन होणार नाही. हयाची जाणिव फुल्यांना होती. त्यातूनच फुलेंनी समविचारी मित्रांना पत्राद्वारे पुण्यात सभा घेण्याचे कळविले. व एका सभेचे आयोजन केले. 24 सप्टेंबर 1873 याच सभेत सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यात आली.[1] सत्यशोधक समाज म्हणजे सत्याचा शोध घेणे, सार्वजनिक अत्याचार, आग्रह धरणे, सत्याच्या अनेक बाजू अनेक पैलू लक्षात घेणारी ही संस्था म्हणून सत्यशोधक समाज हे अन्वयार्थक नाव सर्वांनी संमत केले.[2]

या संघटनेचा सभासद होण्यासाठी कोणत्याही जाती धर्माचे बंधन नव्हते. परंतु काही अटी होत्या. ज्याला सदस्यत्व स्विकारायचे होते त्यांनी अटी व प्रतिज्ञा घ्यावी लागत असे. सर्व मनुष्य एकाच ईश्वराची लेकरे आहेत. त्याचे व माझे बंधुभावाचे नाते आहेत हे जाणून वागण्याचा नित्य प्रयत्न करीन. धार्मिक विधी करतांना मी कोणत्याही मध्यस्थीची गरज ठेवणार नाही स्वत: शिकून मुलामुलींना शिकविल्याशिवाय राहणार नाही.[3] अशी शपथ सभासदत्व स्विकारणाऱ्याला घ्यावी लागत असे. महात्मा फुलेंच्या अटी ह्या मानवतावादी दृष्टीकोन जपणाऱ्या होत्या.

सत्यशोधक समाजाचे तत्वज्ञान

महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजाचे सदस्यत्व स्विकारण्यासाठी अटी ह्या स्वातंत्र्य, बंधुभाव, प्रेम, समता ही उद्देश स्पष्ट करतात. तसेच काही तत्वे सुध्दा होती.

- ईश्वर एक असून तो सर्वव्यापी, निरंकार, निर्गुण व सत्यरुप आहे.
- ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे. ईश्वर प्राप्तीसाठी पुरोहीत मध्यस्थाची गरज नाही.
- कोणीही जातीने श्रेष्ठ ठरत नसून गुणाने श्रेष्ठ ठरतो.[4]

वरील महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजाच्या तत्वज्ञानातून महात्मा फुले हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील विषमता नष्ट करु पाहत होते. त्यांना येथील वर्णव्यवस्था नष्ट करावयाची होती. येथील अस्पृश्यता नष्ट करावयाची होती. म्हणून फुले म्हणतात निसर्गत:च सर्व ईश्वराची लेकरे आहेत. निसर्ग काही भेदभाव करीत नाही. मग

ISSN 2278 - 7984



# Scholars' Vision
## Multi-Disciplinary Bi-annual International Peer reviewed/referred Journal

Volume : XII

**Abasaheb Parvekar College, Yavatmal**

ISSN 2278 - 7984

# ''पर्यावरण शिक्षणाचा अभ्यास काळाची गरज एक चिकित्सक अध्ययन''

प्रा.डॉ. एन. आर. वर्मा
इतिहास विभाग प्रमुख
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महा.,
पुसद जि. यवतमाळ (महाराष्ट्र)
मोबाईल क्रं. ९४२०७७३२०३
ईमेल आय.डी. : narayanvarma67@gmail.com

– सारांश –

आज पर्यावरणात प्रचंड बदल, परिवर्तन होत आहेत. आजच्या परिस्थीतीत भारतामध्ये आपन प्रसार माध्यमाव्दारे पाहतो , ऐकतो, वाचतो की या प्रदेशात, या भागात नैसर्गीक प्रकोप, आपदा निर्माण झाली. पुर, महापूरे, ढगफुटी, दरडी कोसळणे, पाणी वाहणे, पाणी कमी होणे, जनजीवन ठप्प पडणे, रस्ते बंद होणे, लोक बेघर होणे, वादळ आले, वाहतूक व्यवस्था कोलमडली, लोकांचे हाल अपेक्षा वाढल्यात हे सर्वत्र वाढत आहे. मानवाचे आरोग्य दररोज बिघडत आहे, साथीचे रोग वाढत आहेत त्याला पर्यावरणातील असमतोलपणा, असंतूलनपणा कारणीभूत दिसून येतो. कारण जमीन, आकाश, जल, हवा, वायू, वृक्ष ही निसर्ग संपदा ची आजची भारताची स्थिती बिघडली आहे. मानव जातीने विकास, प्रगती, चंगळवाद, भौतिकीकरण च्या नावाखाली निसर्गातील सर्व घटकांना हानी पोहचवीली की निसर्गातून, पर्यावरणातून सर्व ओरबाडून घेतले. आज जमीनीतील घटक कमी झाले, पाण्यातील दुषीतपणा वाढला, हवा प्रदूषीत झाली, धुराचे प्रमाण वाढत आहे, झाडांची कटाई होत आहे, लोकसंख्या चे प्रमाण वाढत आहे यामूळेच सर्व निसर्ग चक्र बदलले आहे. म्हणून मानवजातीला वाचवीण्यासाठी, पुढील पिढीला काही तरी दयावे लागेल, पुढील पिढीच्या गरजा पूर्ण कराव्या लागतील, वसुंधरा हिरवीगार ठेवण्यासाठी, हवा, पाणी, वायू, निसर्ग खनिज संपदा, पशु, पक्षी, प्राणीला जीवंत ठेवण्यासाठी, मानवजातीच्या आपदा, समस्या सोडवीण्यासाठी पर्यावरण शिक्षणाची आज काळाची गरज आहे.

– कि वर्ड –

निसर्ग संपदा, पर्यावरण, आपदा, वृक्ष, जल, हवा, लोकसंख्या समस्या, असमतोलपणा, लूट, कचरा

– प्रस्तावना –

आज २१ व्या शतकात आपन सर्व मनूष्य पाहतो, ऐकतो की पर्यावरणात प्रचंड बदल झाला आहे. निसर्गाचे निसर्गचक्र बदलले आहे. केव्हाही उष्णता वाढते, पाणी पडते, थंडी निर्माण होते. आज पर्यावरणा संबंधी भारतात, जगात काय काय घडून येत आहे आणी घडत आहेत. आजची प्रसार माध्यमे सांगतात, दाखवतात, ऐकवतात की या ठिकाणी पुर, महापूर, ढग फूटी घडून आली, सर्वत्र पाणी वाढले, दरडी कोसळल्या, रस्ते बंद झाले, जनजीवन ठप्प झाले, वित्तहानी आणि प्राणहानी घडली. आज आतिवृष्टी होउन लोकांचे हाल झाले, चक्रीवादळ किंवा वादळे आल्याने अनेक लोक बेघर झाले, रस्ते उखडले, झाडे तूटली, विजपुरवठा बंद झाला, पूल वाहून गेला, वाहतूक व्यवस्था बंद पडली, लोकांच्या समस्या वाढल्या. दुष्काळ व अवर्षनातून लोकांचे प्रचंड हाल होत आहेत, लोकांना खायला अन्न मिळत नाही. नापीकी च्या समस्यामूळे दारिद्रयता चे प्रमाण वाढून भूक ची समस्या वाढली. काही ठिकाणी उष्णता वाढल्याने, थंडीचे प्रमाण वाढल्याने मनूष्यहानी जिवीत हानी झाली. आज हिमालयाचा बर्फ, ध्रुवचा बर्फ वितळत असल्याने नदी, समुद्र चा पाण्याची पातळी वाढली, ओझोन चे प्रमाण कमी कमी होत असल्याने रोगराई चे प्रमाण वाढून साथीचे रोग वाढत आहेत. हवेचा दाब कोठे वाढतो तर कोठे कमी होतो त्याचे दुष्परिणाम वाढत आहे. रेडीयेशन चे प्रमाण वाढल्याने पशु, प्राणी पक्षी वर प्रचंड परिणाम होत आहे. पक्षाची किलबीलाट आज कमी कमी होत चालली आहे. अनेक प्रकारचे साथीचे रोग निर्माण होऊन मनुष्याचे जीवन अधंपतनाकडे वाटचाल करीत आहेत. तेंव्हा प्रश्न निर्माण होतो की, २१ व्या शतकात पर्यावरणाची समस्या का निर्माण होत आहे. आज पर्यावरण का बदलत चालला आहे. निसर्गाचे चक्र का बदलले आहे. नैसर्गीक समस्या आणि आपत्ती का वाढत आहेत. हया समस्याचे समाधानासाठी पर्यावरणाचा अभ्यास करणे आज काळाची गरज बनली आहे. कारण आज पर्यावरणाचा अभ्यास केला नाहीतर निसर्ग आम्हाला माफ करणार नाही. खरे पाहता आज पर्यावरणाची समस्या आम्ही मनुष्य जातीने निर्माण केली आहे. आम्ही पर्यावरणाशी वाटेल तशा पध्दतीने खेळून त्याचे अंधपतन घडवून आनले आहे. पर्यावरणाशी निसर्ग नियमाप्रमाणे न राहता, वैज्ञानिक दृष्टीकोन न बाळगता पर्यावरणातून आम्ही बरेच काही घेतले पण त्यांचा समतोल पणा राखला नाही. तेंव्हा पर्यावरण म्हणजे काय हे पाहणे आवश्यक ठरते ते पुढील प्रमाणे.

विषयाची माहिती व संशोधन –

पर्यावरण म्हणजे ''पृथ्वीवरील पर्यावरणाचे आकलन व मानवी जीवनाचा पर्यावरणावर असणारा प्रभावचा अभ्यास होय.''

''सजीवाने अनूभवलेल्या प्राकृतिक, रासायनीक व जैविक





ISSN 2278 - 7984

परिस्थीती ची गोळा बेरीज म्हणजे पर्यावरण होय.''

''पर्यावरणातील साधन संपदाचा संवर्धन, व्यवस्थापन, नियोजनात्मक विश्लेषणाच्या आणि मानवी हिताच्या दृष्टीने केला जाणारा शास्त्रीय अभ्यास म्हणजे पर्यावरण होय.''

वरील व्याख्येवरून पर्यावरणशी संबंधीत संकल्पना दिसते. यामध्ये जैविक, सजीव व अजैवीक घटक चा समावेश होतो. २० व्या शतकात इ.स. १९६० च्या सुमारास पर्यावरण विषयाला प्रचंड गती मिळाली आणि आज पर्यावरणाशी असलेल्या अभ्यासाला प्रसिद्धी मिळून त्या च्याशी संबंधीत चर्चा, परिषदा, सम्मेलने ला महत्व प्राप्त झाले. कारण पर्यावरणाचा अभ्यास आज चिंता, काळजी करण्याचा विषय झाला आहे. कारण सर्वप्रथम विकसीत देशांनी नवनविन शोध संशोधन करून औद्योगीकरण मोठ्या प्रमाणात घडवून आणले. त्यासाठी निसर्गातील साधन संपत्तीचा अमर्याद वापर केला. त्याला अनूसरून मग अविकसीत देशांनी सुध्दा कोणतेही नियोजन, व्यवस्थापण न करता निसर्ग संपत्तीचा प्रचंड वापर केला. त्यामुळेच आज पर्यावरणाचा असमतोल पणा, असंतूलनपणा निर्माण झाला. .०विकसीत अविकसीत राष्ट्रांनी विकास, प्रगती, प्रबलता निर्माण च्या नावाखाली डामडौलपणा दखविण्यासाठी आणि अन्न, वस्त्र, निवारा या मानव जातीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी निसर्गातील प्राकृतिक साधन संपत्तीची लूट केली. सर्वत्र जंगलतोड करून, खनिज पदार्थ व पाण्याची हानी घडवून आनली. त्यामूळे हवा, वायू, पाणी, जमीन, आकाश, दुषीत बनली. आज हवामानात प्रचंड बदल होत आहेत. दररोज रोगराईचे प्रमाण वाढत आहे. अन्न, वस्त्र, निवारा मिळणे मानवजातीला कठीन होत आहे. हवा आणि पाणी निसर्गाने मानव जातीला फूकट दिले. परंतू निसर्गाच्या, पर्यावरणाच्या असमतोलपणामूळे, असंतूलीतपणामूळे मानवजातीवर हवा, पाणी विकत घेण्याची वेळ निर्माण झाली आहे. मानवजातीला दैनंदीन गरजा पूर्ण करण्यासाठी दररोज संघर्ष करीत रहावे लागत आहे. म्हणून पर्यावरण शिक्षण प्रत्येक नागरीकाला देणे आवश्यक ठरते. त्यासाठी सर्व प्रथम पर्यावरण असमतोलपणाची कारण पाहणे आवश्यक आहे.

१) औद्योगीकरण ची वाढ आणि स्पर्धा –

आज भारतात आणि जगात मानवजातीच्या गरजा पूर्ण करणेसाठी प्रचंड प्रमाणात उद्योगधंदे, कारखाने निर्माण करण्यात आले. भौतीक सुखाच्या लोभापायी नवनवीन उद्योगांना जन्म दिल्या जात आहे. आपल्या राष्ट्राचे महत्व वाढवीणे, त्यांचा डामडौलपणा दाखवीणे च्या नावाखाली घातक उत्पादने, विनाशक असणारे रासायनीक कारखाने, रेडीयेशन वाढवीणारी, पृथ्वीचे तापमान वाढवीणारे, हवामानात बदल करणारे भौतीक घटक वाढवील्या जात आहेत. या औद्योगीक स्पर्धामुळे हवामान बदल चे संकट आज जगात निर्माण झाले आहे. कारण हवामानात कार्बन चे प्रमाण वाढले आहे. इ.स. १९७०-८० च्या दशकात भारतात अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीन गरजा होत्या आज इ.स. २०२३ मध्ये भौतीक सुख, साधने च्या गरजा निर्माण झाल्यात. म्हणून शुद्ध हवा, पाणी, जेवन मिळणे कठीण झाले आहे. प्रचंड रोगराई वाढली आहे.

कारण औद्योगीकरणामूळे, कारखान्यामूळे जंगले कटाई सुरू आहे, मोठमोठे रस्ते बांधल्या जात आहेत. लोकांना राहण्यासाठी घरांची संख्या वाढत आहे. आधुनिक पद्धतीने रासायनीक शेती चे उत्पादन घेतल्या जात आहे. कारखान्यातून निघणारा धूर जैविक कचरा, रासायनीक पाणी, इलेक्ट्रॉनिक कचराचा धूर वाढत आहे, पाणी दूषीत होऊन आरोग्याला हानी पोहचत आहे. रोगराई चे प्रमाण वाढत आहे. उद्योगधंदेला कच्चा माल जमिनीतून मिळतो. त्यासाठी जंगलकटाई सुरू आहे. खनिजपदार्थ मिळविण्यासाठी खाणी जमिनीचा स्तर कमी जास्त केल्याने जात आहे. वाहतूकीच्या साधनासाठी लागणारी घटके मोठ्या प्रमाणात वाढवीली जात आहेत. विज निर्मीतीसाठी कोळसा, पाणीचा प्रचंड वापर सुरू आहे. आपले पूर्वेज सांगतात की याठिकाणी जंगले होती पण आज या ठिकाणी सिमेन्टीकरण आहे. तापमानात वाढ झाल्याने निसर्गाचे चक्र बदलले. कार्बन डाय-ऑक्साईड चे प्रमाण हेवत वाढल्याने पर्यावरणात बदल झाले. म्हणून केव्हाही उष्णता, पाऊस पडतो. भोगवादी व चंगल वादी संस्कृतीचा उदय औद्योगीकरणामूळे झाला. पशु, पक्षी, प्राणीची संख्या कमी होत आहे. चैन सुख वाढले पण सुखाची झोप नाही. आज शहरीकरण वाढलेले दिसून येते. ही औद्योगीकरणाची देन आहे. शहरीकरणामूळे जंगले नष्ट होत आहेत. कारण त्यांना लागणाऱ्या वस्तू, घटक, साधने पूर्ण करण्यासाठी झाडे, वृक्ष कापल्या जात आहेत. आज मनूष्य जातीचा प्रवास इलेक्ट्रानिक्स, कॉम्प्यूटर च्या युगात सुरू असल्याने पाणी, वायू, हवा, ध्वनी चा समतोलपणा राहिला नाही. आज सृष्टी मधील मनूष्य, पशु, प्राणी, पक्षी यांचे जीवन संकटात आहे. याचा गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे.

२) जमीनीतील घटकांचा ऱ्हास –

आज जमीनीवर वृक्ष, पशु, प्राणी, पक्षी, मनूष्य जाती राहते. आज जमिनीवरील निसर्ग संपत्ती सर्व सजीव जीवाचे पालन करण्यास समर्थ नाही. कारण जमिनीतील खनिज संपत्ती, आधूनीकीकरणाच्या नावाखाली समाप्त करणे सुरू आहे. वन्य प्राण्याची शिकार करणे सुरू आहे. वनाची जंगल तोड सुरू आहे. आज जमिनीवरील अन्न मिळविण्यासाठी शेतीचे उत्पादन वाढवीणे आवश्यक आहे. सिंचनासाठी पाण्याची उत्पादकता वाढीवणे आवश्यक आहे. सौर उर्जाचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. आज उर्जाची, पाण्याची काटकसर आवश्यक आहे. आज जमिनीवरील नैसर्गीक साधनांचा गैर वापर वाढला आहे. नैसर्गीक मालमत्ते विषय जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. बांधकामावर नियंत्रण आवश्यक आहे.

परंतु जमीनीवरील अनेक घटकावर आज मनूष्य जातीने अतिक्रमण केले. जमीनीवरील कच्ची उत्पादीत साधने नष्ट केली. दुषीत कचऱ्याचे प्रमाण वाढवीले. म्हणून आरोग्यावर परिणाम घडून येत आहेत. जंगलावरील संपत्तीचा विध्वंस वाढल्याने आज भारतात दरडी कोसळणेचे प्रमाण वाढ झाली आहे. धरणे, कालवे बांधल्याने पृथ्वीचा असमतोल पणा वाढला

ISSN 2278 - 7984

जमिनीचे रासायनीकरण, यांत्रीकीकरण झाल्याने उत्पादीत वस्तूमध्ये रासायनीक गुणधर्म वाढले. त्याचे आरोग्यावर परिणाम वाढलेले दिसून येतात. डोंगर, दऱ्या, खोरे, पर्वत, झाडे, वनस्पती, रस्ते बांधनी, रेल्वे प्रकल्प बांधनी, उडाणपूले बांधनी, पोर्ट बांधनी मुळे निसर्गाची अस्त व्यस्तता झाली. आधूनीक जीवशैली, भौतीक सुखच्या नावाखालील जामिनीवर टॉवर्स ची संख्या वाढली. त्यातून रेडीएशन वाढत आहे. पशु, पक्षी प्राणी चे प्रमाण त्यामूळेच कमी होत आहेत. यामूळेच पर्यावरणाचा असमतोलपणा निर्माण झाला.

३) वनीकरणाचा ऱ्हास –

आज २१ व्या शतकात लोकांच्या आवश्यक गरजा पूर्ण करणे, विकास करणे, देशांची प्रगती घडवून आणने या कारणास्तव जंगल कटाई, वृक्षतोड, धरणे बांधने, इमारती बांधणे, रस्ते बांधणे, लोहमार्ग करणे, खाणीतून खनिज पदार्थ मिळणे सुरू आहे. त्यामधून वनीकरणाचा ऱ्हास होत आहे. मानव जातीने कल्याण वृक्षतोड मधून जात आहे. कारण वृक्षतोडीतून धरातील आवश्यक गरजा पूर्ण होतात, औषधी मिळते, घरे बांधली जातात, शेती अवजारे केले जातात, इंधन म्हणून ग्रामीण क्षेत्रात मोठा वापर होतो, कागदनिर्मीती होते, कच्चा माल म्हणून अनेक उद्योगात वनस्पतीचा वापर होतो, जहाज बांधणी मध्ये वापर होतो, क्रिडा साहित्यात वापर होतो, खेळणीमध्ये वापर होतो, पशुपालनसाठी वापर होतो. वास्तवीक पाहता मानव जातीने आपल्या फायद्यासाठी, सुखसोईसाठी बेसुमार वृक्षतोड केली. पर्यावरणाला धोका निर्माण करणारे धरणे, विजनिर्मीती प्रकल्प बांधली जात आहेत. या वृक्षतोडीमूळे भारतात पाण्याची कमतरता निर्माण झाली आहे. वाऱ्याचे प्रमाण कमी झाल्याने उष्णता वाढत आहे. जमीन नापीक बनत आहे. पशुपक्षी प्राणी च्या जीवनावर परिणाम होत आहे. ऑक्सीजन चे प्रमाण कमी होऊन कार्बन चे प्रमाण वाढत आहे, जंगली प्राणीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. यातून पर्यावरणाचा ऱ्हास घडला म्हणून पर्यावरणाचा असमतोलपणा निर्माण झाला.

४) जलसंपदा चा ऱ्हास –

शेतीचे, मानवाचे, पशु, प्रणी, पक्षीचे जीवन पाण्यावर अवलंबून आहे. पाण्यावर जलसिंचन, जलवाहतून, कारखाने, मासेमारी सारखे उद्योग अवलंबून आहेत. पाण्याला जीवाचा आत्मा म्हटल्या जाते निसर्गाने मानवीजीवन जगण्यासाठी, पशु, प्राणी, पक्षीची वाढ होण्यासाठी आणि जिवंत राहण्यासाठी पाणी मुबलक प्रमाणात दिले. शेती करणे, औद्योगीकरण करणे, जंगले वाढविणे साठी पाणी आवश्यक आहे. पृथ्वीवर पाणी घटक फार महत्वाचा आहे. पाण्यामूळे उष्णतेचे तापमान कमी राहते.

प्राचीनकाळी पाण्याची कमतरता नव्हती. परंतू मानव जातीने पाण्याचा उपसा फार मोठ्या प्रमाणात केला. पाण्याचे योग्य नियोजन, व्यवस्थापन केले नाही. म्हणून जमीनीतील पाण्याचे प्रमाण कमी झाले. आज हवामान बदलामूळे काही प्रदेशात पाणी जास्त पडते तर काही भागात पाणी कमी पडते. काही नद्यांना पूर, महापूरे येतात. काही भागात पाणी कमी पडल्यामूळे कोरडा राहतो. म्हणून कालव्याचे जाळे तयार करणे आवश्यक आहे. समुद्रात वाहून जाणारे पाणी अडवीणे काळाची गरज आहे. पाणी अडवा पाणी जिरवा ही संकल्पना मानव जातीने चळवळ म्हणून उभी करणे आवश्यक आहे. आज पाण्यासाठी भांडण-तंटे वाढले. राज्या राज्यात वादविवादे वाढले. त्यामधून न्यायालयीन कार्य वाढले. परंतू आज सर्व ठिकाणी नियोजन नाही. भारतात बाटली बंद पाणी विकल्या जात आहे. त्यामधुन हजारो कोटी रूपये चा व्यवसाय केला जात आहे. परंतू आज पाण्याची स्थिती दुष्काळा सारखी निर्माण झाली. हा दुष्काळ मानव निर्मीत आहे. नदी, नाले, तलाव पाण्याचे खरे उगम आहे परंतू मानवजातीने सर्व पाणी ओरबडून घेतले आणि बाजारपेठ निर्माण केली.

परंतू आज शहाराची, उद्योगधंद्याची, कारखान्याची वाढ झाल्याने दुषीत पाणी निर्माण होत आहे. गावाची, शहराची घाण नदीत सोडली जात आहे. वादळे, दरडी कोसळणे, धूर चे प्रमाण वाढले, किटकनाशके, रासायनीक जंतूनाशके, पालापाचोळा मूळे पाणी दुषीत होत आहे. खनिज तेल वाहून जाते तेव्हा तो पाण्याचा भाग दुषीत होतो. यामूळे पर्यावरणाचा असमतोलपणा निर्माण झाला.

५) लोकसंख्येत वाढ–

